# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक ११.०१.२००७ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.**

गुरूवार दिनांक ११ जानेवारी २००७ रोजी मा.महापौर डॉ.भागवत किशनराव कराड यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील ''प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह ''येथे दुपारी १२.०० वाजता ''वंदेमातरम्''या गिताने सुरू झाली.सभेला मा.आयुक्त तसेच संबधीत अधिकारी व खालील प्रमाणे स. सभासद उपस्थित होते.

०१. स.स.सौ.लता श्रीनिवास दलाल
०२. स.स.श्री.रेणुकादास वैद्य
०३. स.स.श्री.संतोष खेंडके पाटील
०४. स.स.श्री.अ.साजेद अ.सत्तार
०५. स.स.श्री.बमने पुनमचंद सोनाजी
०६. स.स.श्री.सुरे सिताराम इसराम
०७. स.स.श्री.ताठे भाऊसाहेब पुंडलिक
०८. स.स.श्री.गवळी रविकांत काशिनाथ
०९. स.स.श्री.नाहदी नासेर मोहमद याहीया
१०. स.स.श्री.पांडे विनायक प्रभाकर
११. स.स.श्री.दाभाडे मिलींद यशवंत
१२. स.स.श्री.धिल्लन तरविंदरसिंग महेंद्रसिंग
१३. स.स.श्री.ठाकुर पुरूषोत्तम रघुविरसिंग
१४. स.स.श्री.खान सलीम खान यासीन
१५. स.स.सौ.लक्ष्मी आशन्ना शंकर
१६. स.स.श्री.जगताप संजय उत्तमराव
१७. स.स.सौ.मसरद बेगम शरफोद्दीन
१८. स.स.श्री.गायकवाड दिलीप नारायण
१९. स.स.श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
२०. स.स.सौ.जोशी रजनी रमेश
२१. स.स.श्री.अत्तरदे प्रकाश सुका
२२. स.स.श्री.जैस्वाल अनिल जुगललाल
२३. स.स.श्रीमती शिंदे मिराबाई रामराव
२४. स.स.सौ.पाटील दिपाली सुनिल
२५. स.स.सौ.बेंद्रे विमल तुकाराम
२६. स.स.श्री.कोकाटे काशिनाथ हरीभाऊ
२७. स.स.श्रीमती अजरा जबीन मसुद

२८. स.स.सौ.खान मेहेरून्नीसा खान हमीद
२९. स.स.श्री.मो.जावेद मो.इसाक
३०. स.स.सौ.मिटकर शोभा हरीश्चंद्र
३१. स.स.सौ.यास्मिन बेगम अ.कदिर
३२. स.स.श्री.खान जावेद हसन कासीम हसन
३३. स.स.श्री.किशनचंद लेखराज तनवाणी
३४. स.स.श्री.सय्यद खुसरो बुऱ्हानोद्दीन
३५. स.स.श्री.अ.रशिद खान मामु
३६. स.स.श्री.पाटील नरवडे वसंत पांडुरंग
३७. स.स.श्री.रिडलॉन संजु सुग्रीव
३८. स.स.सौ.सिध्द वीणा गजेंद्र
३९. स.स.श्री.खान कैसर बद्रोद्दीन
४०. स.स.सौ.कुरैशी नजमा बेगम युनूस
४१. स.स.श्री.खान मुजीब मीर आलम खान
४२. स.स.श्री.शेख इब्राहीम शेख इमाम
४३. स.स.श्री.हाजी शेरखान अ.रहेमान
४४. स.स.सौ.राऊत छाया विलास
४५. स.स.श्री.दत्ताभाऊ पाथ्रिकर
४६. स.स.श्री.देसरडा प्रशांत सुभाष
४७. स.स.श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण
४८. स.स.श्री.अमोदी अबुबकर बिन सईद
४९. स.स.श्रीमती शेख शमशाद बेगम शेख हफीज
५०. स.स.श्री.जेजुरकर संतोष सुधाकरराव
५१. स.स.श्री.मोतीवाला अश्रफ महंम्मद युनूस
५२. स.स.श्री.तुपे त्र्यबंक गणपतराव
५३. स.स.सौ.पोळ सरला सखाराम
५४. स.स.श्री.कटकटे सतीष विश्वनाथ
५५. स.स.सौ.बोरामणीकर कला सुरेश
५६. स.स.सौ.मंगला प्रकाश गायकवाड
५७. स.स.श्री.सावंत मधुकर दामोधर
५८. स.स.सौ.रेखा कैलास काथार
५९. स.स.श्री.गांगे रविंद्र लक्ष्मण
६०. स.स.सौ.पाटणी हर्षमाला विजयकुमार
६१. स.स.श्रीमती डॉ.बिनवडे आशा उत्तम
६२. स.स.श्री.खुडे विजय किसन
६३. स.स.श्री.शिंदे दामोधर माधवराव
६४. स.स.श्री.गांगवे बन्सीलाल तुळशीराम

६५. स.स.सौ.ससाणे सरीता अशोक
६६. स.स.श्री.भगवान देविदास घडमोडे
६७. स.स.श्री.वाघ भाऊसाहेब बाबुराव
६८. स.स.श्री.डांगे बाबासाहेब लक्ष्मण
६९. स.स.श्री.कुचे नारायण तिलोकचंद
७०. स.स.सौ.शिंदे पुष्पा बाळु
७१. स.स.सौ.वाघमारे पार्वताबाई विजय
७२. स.स.सौ.जाधव संगिता विठ्ठलराव
७३. स.स.श्री.विसपुते शंशाक दामोधर
७४. स.स.श्री.निमगावकर प्रल्हाद गणपतराव
७५. स.स.श्रीमती खंदारे वंदना प्रकाश
७६. स.स.सौ.कोंडेकर अंजली दिलीप
७७. स.स.श्री.जोशी संजय रामदास
७८. स.स.सौ.विजया किशोर रहाटकर
७९. स.स.श्री.दाभाडे हिम्मतराव साळुबा
८०. स.स.श्री.ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंग
८१. स.स.श्री.मोरे कचरू विश्‍वनाथ
८२. स.स.श्री.शिरसाट संजय पांडुरंग
८३. स.स.सौ.जैन अल्पा विकास
८४. स.स.सौ.मोमीन सफीया फिरदोस
८५. स.स.सौ.अनिता नंदकुमार घोडेले

**नामनिर्देशित पालिका सदस्य**

०१. स.स.श्री.संजय किसनराव केनेकर
०२. स.स.श्री.तुलशीबागवाले किशोर बाबुलाल
०३. स.स.श्री.राजेश व्यास
०४. स.स.श्री.सुरजितसिंग सबरवाल
०५. स.स.श्री.कुलकर्णी सुरेंद्र माणिकराव

**चर्चा :**

श्री.संजय जोशी : मराठवाडयात परीचित असलेले या शहराचे प्रसिध्द रंग कर्णी स्व. कुमार देशमूख यांचे दु:खद निधन झालेले आहे त्यांना सभागृहा तर्फे श्रध्दाजंली अर्पण करण्यात यावी.

श्री. संतोष खेंडके : यास माझे अनुमोदन आहे.

मा. महापौर : : ठिक आहे सर्वांनी श्रध्दाजंली अर्पण करण्यासाठी उभे रहावे.

याच वेळी प्रसिध्द रंगकर्णी स्व. कुमार देशमूख यांना सभागृहातर्फे दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दाजंली अर्पण करण्यात आली.

श्री. मुजीब खान : अधिकारी सभागृहात उपस्थित नाही ,कोरम नाही सभा तहकूब करावी.

मा. महापौर : कोरम अभावी १० मिनिटासाठी सभा तहकूब करण्यात येते. (वेळ दुपारी १२.०३ वा. पून्हा सभा १२.१५ वा. सुरू)

श्री. संजय सिरसाट : सर्वसाधारण,स्थायी समितीच्या बैठकीमध्ये सचिव म्हणून दुसरेच अधिकारी बसलेले दिसतात. सचिव गेले कुठे त्यांना कोणत्या प्रकारची रजा दिली. या बद्दलची माहिती सभागृहाला देण्यात यावी.

श्री. संतोष खेंडके : विषयपत्रिका अगोदर घेण्यात यावी.

मा. महापौर : नगर सचिव यांचे संदर्भात सहा. आयुक्त -१ यांनी खूलासा करावा.

सहा. आयुक्त -१ : नगरसचिव श्री.एम. ए पठाण हे दिनांक ७.१२.२००६ पासून ५८ दिवसाच्या अर्जीत रजेवर गेलेले आहे.

श्री. संजय सिरसाट : माझ्या माहिती प्रमाणे धार्मीक कामासाठी गेले असून शासनाने त्याबाबत महानगरपालिकेची एन.ओ. सी मागविलेली होती ती सूध्दा महापालिकेने दिलेली आहे. जर शासनास प्रशासनाने एन. ओ . सी दिली त्याची माहिती सभागृहाला आहे का याचाही खूलासा करावा.

श्री.मुजीब खान : हजला जाण्यासाठी नगरसचिव हे सूट्टीवर गेलेले आहे प्रशासनाकडे त्यांनी रजेचा अर्ज दिलेला आहे.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय: ५८ दिवसाची त्यानी अर्जीत रजा घेतलेली आहे. मान्य झाली नाही तर विना पगारी मंजूर होईल.ही प्रशासकीय बाब आहे. त्यावर चर्चा करणे योग्य नाही.

श्री.संजय सिरसाट : ते धार्मीक कामासाठी गेले त्यास माझा विरोध नाही परंतू कोणताही कर्मचारी पदाधिकारी नगरसेवक जर परदेशात जायचे असेल तर या महानगरपालिकेची त्यांना एन.ओ. सी घ्यावी लागते. शासनाने कळविले होते महापालिकेची एन.ओ. सी घ्यावी. महानगरपालिका म्हणजे हे सभागृह या सभागृहाची एन. ओ. सी का घेतलेली नाही.

मा. महापौर : नगर सचिव यांना महाराष्ट्र शासनाच्या वतीने पाठविण्यात आलेले आहे. शासनाचे गृह विभागाकडे त्यांचे नाव आले होते याची शासनास कल्पना आहे. ते महापालिकेच्या खर्चाने गेलेले नाही.

श्री. संजय सिरसाट : स्वत:च्या खर्चाने गेले असले तरी परदेशात जाण्यासाठी महानगरपालिकेची एन. ओ. सी आवश्यक आहे. प्रशासनाने एन. ओ. सी दिली.एखादा अधिकारी देशाबाहेर जातो कर्मचारी देश सोडून जातो साधी कल्पना यासभागृहाला दिली जात नाही आपण त्यांना मुख सम्मती देता.हे बरोबर वाटत नाही.

श्री.काशिनाथ कोकाटे : कोणत्याही शासकीय कर्मचाऱ्याची रजा मंजूर झाल्यानंतर त्यांना जाता येते.त्यावर चर्चा करणे बरोबर नाही.

मा.महापौर : नगरसचिव यांचे पद हे महापौराच्या अधिपत्याखाली येते. नगरसचिव हे रजेवर गेले याची मला कल्पना त्यांनी दिलेली आहे.

श्री.संजय सिरसाट : शासनाने त्यांना जाण्यासाठी महानगरपालिकेची एन. ओ. सी मागविली होती. महानगरपालिका म्हणजे सर्वसाधारण सभा आयुक्त नव्हे. परंतू या सभागृहाची परवानगी घेतलेली नाही.असे असतांना प्रशासनाने परवानगी दिली कशी.

श्री.काशिनाथ कोकाटे : सर्वसाधारण सभेचे अध्यक्ष हे मा. महापौर आहे. नगरसचिव यांनी मा. महापौरांची परवानगी घेवून गेलेले आहे. महापौरांनी त्यांना जाण्याची परवानगी दिलेली आहे.

श्री.संजय सिरसाट : महापालिकेची म्हणजे या सभागृहाची परवानगी घ्यायला पाहिजे होती महापौर म्हणून आपण परवानगी दिली असेल तर आपण सूध्दा या सभागृहाची दिशाभूल केलेली आहे हा माझा आरोप आहे.

श्री.संतोष खेंडके : विधी सल्लागार यांचा अभिप्राय घ्यावा.

मा. महापौर : विधी सल्लागार यांचा अभिप्राय घेण्याची गरज नाही सचिव हे महापौरांच्या अंडरमध्ये काम करतात.मला त्यांनी कल्पना दिलेली असून मी परवानगी दिलेली आहे.

श्री.संजय सिरसाट : महापौर म्हणजे पिठासीन अधिकारी ,सर्वसाधारण सभा नाही.

श्री.संजय जगताप : विषय पत्रिका घेण्यात यावी.

श्री.संजय सिरसाट : अगोदर चर्चा घेण्यात यावी.

**विषय क्र. ६५२/१ :**

आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, गरवारे स्टेडीयम येथे जलतरण तलाव बांधणेच्या रक्कम रू.२.५० कोटीच्या अंदाजपत्रकास तसेच सदर काम मनपातर्फे रूपये १.०० कोटी तसेच विकासकाकडून रूपये १.५० कोटी खर्च विभागुन जलतरण तलावाचे तसेच सलग्न काम पुर्ण करण्याच्या प्रस्तावास मा.सर्वसाधारण सभेने विषय क्र.३८२ दिनांक १७.८.२००६ अन्वये मंजुरी दिल्यानुसार कामाची (Expression of interest) अन्वये निविदा सुचना मनपा/जा.क्र./लेखा/नि/२२/२००६ दिनांक १८.११.२००६ नुसार राज्यस्तरीय वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यात आली असता निविदा विक्री दिनांक २८.११.२००६तसेच निविदा स्विकृती दिनांक २.१२.२००६ पर्यंत अनुक्रमे एकही निविदा विक्री व स्विकृत झालेली नाही त्यामुळे सदर कामास (Expression of interest) संदर्भाने कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने तसेच मा.सर्वसाधारण सभेने विषय क्र.३८२ दिनांक १७.८.२००६ अन्वये मंजुरी दिल्यानुसार जर प्रतिसाद न मिळाल्यास सदर प्रकल्प महानगरपालिकेच्या माध्यमातून करावयाचे धोरण निश्चीत करण्यात आलेले आहे.

सदरील प्रकल्पा करीता अर्थसंकल्प सन २००६-०७ अंतर्गत र.रू.१.०० कोटीची तरतुद उपलब्ध असुन उर्वरीत र.रू.१.५० कोटीची तरतुद पुढील आर्थिक वर्षात करावी लागेल.

सदर प्रकल्प १ वर्षात पुर्ण करावयाचा असुन प्रकल्प पुर्ण झाल्यानंतर त्याची देखभाल दुरूस्ती व प्रकल्प सुस्थितीत ठेवण्याची जबाबदारी स्वखर्चाने पुढील ३ वर्षापर्यंत नियुक्त मक्तेदाराची राहील. सदर प्रकल्पा करीता नियुक्त मक्तेदार/ एजन्सीजला काम प्रगतीपथावर असतांना प्रत्येक दरम्यान देयका पैकी निव्वळ ७७% देयक अदा करण्यात येईल. तसेच नियोजीत काम पुर्ण झाल्यानंतर संबंधिताच्या देयकातून सुरक्षा ठेव म्हणून राखुन ठेवलेल्या २३% रक्कमेपैकी ५% रक्कम देयकाच्या १ वर्षाच्या कालावधीनंतर ६% रक्कम २ वर्षाच्या कालावधीनंतर,७%रक्कम ३ वर्षाच्या कालावधीनंतर व उर्वरीत ५% रक्कम प्रकल्प सुस्थितीत महानगरपालिकेस हस्तांतरण केल्याच्या ९० दिवसानंतर अदा करण्यात येईल.

प्रकल्प ३ वर्ष देखभाल दुरूस्ती सह सुस्थितीत ठेवण्याकरिता मक्तेदारास/एजन्सीधारकास येणारा खर्च भागविण्या करीता विकसीत केलेल्या सर्व सोई सुविधांचा लाभ घेणाऱ्या ग्राहकाकडून (महानगरपालिका यांचा भाग सोडून)महानगरपालिकेतर्फे सिध्दार्थ जलतरण तलाव येथे जे शुल्क आकारण्यात येते त्यानुसार शुल्क आकारणी करून तसेच आजीवन सदस्यत्व, मासीक सदस्यत्व, दैनिक शुल्काव्दारे वसुल करू शकेल

तसेच सौन्ना व स्टीम बाथ, स्कॉश कोर्ट, आधुनिक जिम्नॅशियम करीता वेळोवेळी महानगरपालिकेने ठरवून दिलेल्या दरानुसार शुल्क आकारणी करून सर्व जमा होणाऱ्या शुल्कातून प्रकल्पालगत अस्तित्वात असलेल्या दोन बॅडमिंटन कोर्टची लाकडी फ्लोरींग बदलुन अत्याधुनिक पध्दतीचे फ्लोरींग असलेले बॅडमिंटन कोर्ट उभारण्यासाठी स्वत:ची रक्कम रूपये १५.०० लक्ष इतका खर्च करावा सदर खर्चाचा परतावा महानगरपालिका देणार नाही सदर खर्च प्रतिकोर्ट साठी प्रतिमहा, प्रतितास रूपये १०००/- पर्यंत शुल्क आकारूण ३ वर्षाचा कालावधी पर्यंत मक्तेदाराने/एजन्सीजधारकाने वसुल करावा तसेच सदर कोर्ट वर दररोज सकाळी ७.०० ते ८.०० पर्यंत ची वेळ महानगरपालिका अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी विनाशुल्क राखीव ठेवण्यात येईल.

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर विचारार्थ तथापी मान्यतेस्तव सादर.

श्री.संजय सिरसाट : मंजूरी देण्यात यावी.

श्री.मुजीब खान : प्रस्ताव वाचल्यानंतर असे लक्षात येते की त्याच ठेकेदारास तीन वर्षासाठी काम दयायचे आहे. महापालिकेच्या खर्चाने करणार की संबधीत व्यक्तीना तीन वर्षासाठी देणार आहे कोणत्या बेसीसवर देण्यात येत आहे.याचा खूलासा करावा.

मा.आयुक्त :यापूर्वी जेंव्हा प्रस्ताव आला होता त्यावेळी हे बीओटी बेसीसवर करण्यात यावे.अशी मान्यता दिलेली होती.जर यास प्रतिसाद मिळाला नाही तर पून्हा सभागृहासमोर ठेवावा. आपण आपले पैसा खर्च करू बीओटीवर टेंडर काढले त्यास प्रतिसाद मिळाला नाही. त्यामूळे सर्वसाधारण सभेने जे डायरेक्शन दिले होते त्यानूसार वेगळया पध्दतीने प्रस्ताव मांडलेला आहे. यात असे की पूर्ण खर्च महापालिकेने करून कन्स्ट्रक्शन करून घेवू यानंतर देखभाल दूरूस्तीचा ठेका प्रत्येक वर्षी देणार आहे परंतू ज्या व्यक्तीने बांधलेले आहे त्याची कामाची प्रत चांगली राहिल व कमीत कमी त्यांनी तीन वर्ष मेन्टेन करावे. शिवाय त्यास पैसे सूध्दा टप्प्या टप्प्याने देण्या बाबत सुचना दिले यामागे एकच उद्येश आहे की जो व्यक्ती काम करेल त्याच व्यक्तीने तीन वर्ष देखभाल दूरूस्ती करावी. या प्रमाणेच विषय क्र २ पण आहे.

श्री.मुजीब खान : जो व्यक्ती काम करेल त्यावर प्रशासनाचा भरवसा दोन कोटीचे काम करेल ते चांगले करेल की नाही हे आज माहित नाही.प्रशासन कोणते ही काम विचार न करता समोरच्या व्यक्तीला काम देत आहे. पैसे ही देत आहे. जेकी या भावनेने की तो काम चांगले करेल.दुसरे ठेकेदार काम करू शकत नाही काय? महानगरपालिकेची मालमत्ता आहे व महानगरपालिकाच करारनामा करीत आहे.

मा.महापौर : या प्रस्तावामध्ये शेवटी असे दिले की दररोज सकाळी ७ ते ८ पर्यत ची वेळ महानगरपालिका अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी विनाशुल्क राखीव ठेवण्यात येईल ही ओळ रद्य करण्यात येते. सर्वाना शुल्क लागेल.

सौ. खान अजरा जबीन :३ वर्षासाठी बीओटीवर काम करण्याचा ठेका देणार आहे. इतर शहरातील विकास कामे होत नाही यावर एवढी मोठी रक्कम का खर्च केली जात आहे.

श्री.सय्यद खुसरो : शहरातील इतर विकास कामे होत नाही. हे करण्याची काय आवश्यकता पडली.

श्री.संजय सिरसाट : जे कर्मचारी अधिकारी कार्यालयीन वेळेत तेथे जातील त्यावेळी त्यांना ऑन ड्युटी म्हणून समजण्यात यावे. त्यामूळे त्याची सूविधा होईल.

मा.महापौर : सुविधेचा प्रश्न नाही अधिकारी कर्मचारी असतील कूणालाही सूविधा दिली जाणार नाही. वरील दुरूस्तीसह मंजूर करण्यात येत आहे.

श्री.सलीम खान : हा विषय मंजूर करावा दूमत नाही परंतू यापूर्वी जे विकास कामे झाले काही कामाचे टेंडर काढले नाही ती कामे नियमानूसार झालेली आहे काय याची चौकशी करावी. या कामाचे सूध्दा टेंडर काढावे.

सौ. खान अजरा जबीन : स्वामी विवेकांनद उद्यान येथील काम बीओटीवर करणार होते आजपर्यंत ते काम करण्यात आलेले नाही. इतर मागिल विकास कामे न करता अशी मोठमोठी कामे का मंजूर केली जात आहे.

मा.महापौर : या संदर्भात मा. आयुक्त यांनी खूलासा करावा.

मा. आयुक्त : बीओटी कमेटीच्या नंतर सर्वसाधारण सभेच्या मंजूरीने कामा बाबतचे टेंडर काढले होते.काम करणारी एजन्सी होती त्यांनी महापालिकेने दिलेल्या कालावधीत रक्कम न भरल्यामूळे एजन्सी धारकास नोटीस देवून बीओटीचे टेंडर रद्य केले. संबधीतानी तयारी दर्शविली नाही व जे डिपॉजीट दिले होते ते जप्त केलेले आहे. त्या प्रमाणे गरवारे स्टेडीयम येथेही टेंडर काढून कूणी आले नाही. तसेच स्वामी विवेकानंद गार्डन येथे ही कुणी काम घेणार की नाही असे वाटत आहे.शासनाचे हार्टीकल्चर प्रोजेक्ट कडून काही मदत होते काय म्हणून प्रयत्न करीत आहे तेथे रोज गार्डनसाठी पैसे मिळावे कालच या संदर्भात माहिती मिळाली की यासाठी मदत होणार आहे त्यानूसार तेथे प्रपोज करीत आहे. दोन तीन महिण्यात ते प्रपोजल सुरू झाल्याचे दिसेल.

श्री.मुजीब खान : महापालिकेच्या अनेक विकास कामाचे टेंडर भरण्यास कूणी तयार नाही त्याचे कारण काय. सर्व सदस्य येथे विकास कामासाठी निवडून आलेले आहे बजेटनूसार ९० ते ९५ टक्के बजेट विकास कामावर खर्च करण्यात येईल असे म्हटले होते. परंतू दीड वर्षात कोणतेही विकास काम झाल्याचे दिसून येत नाही. वार्ड कार्यालयाकडून अंदाजपत्रक तयार होवून आल्यानंतर परत केले जात आहे. तसेच काही कामा बाबत टेंडर काढले जाते व वेगवेगळया कारणाने रद्य केल्या जाते. याचे कारण काय?बीओटीच्या व्यतिरिक्त ही जसे जिल्हाधिकारी कार्यालयाकडून येणारा रस्त्यावरील पूल करण्या संदर्भात निविदा काढलेली होती ज्यानी काम घेतले होते ते परत करीत आहे.याचे कारण काय ?आजपर्यंत किती विकास कामे झालेली आहे व आणखी वर्ष अखेर किती होणार आहे याचा खूलासा करावा.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय: यापूर्वी बीओटीवर करण्यास विरोध केला होता परंतू त्यावेळी हे काम नागरी सूविधेसाठी आहे म्हणून खूलासा करण्यात आला होता. बीओटीवर देण्याची पॉलीसी रद्य करण्यात यावी.

मा. आयुक्त : बीओटीचे चार टेंडर काढले होते. तीन पुर्णत्वाकडे गेले. त्याचे वर्कऑर्डर झाल्या असून करारनामा झालेला आहे. स्वामी विवेकांनद उद्यान येथील बीओटीचे काम रद्य केले आहे

मा. महापौर : मा. आयुक्त यांनी स्वामी विंवेकानंद गार्डन येथे विकास करण्याच्या संदर्भात खूलासा केला.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉ: बीओटीवर टेंडर काढणार काम महापालिका करणार. त्यासाठी बजेट प्रोव्हिजन काय आहे तीन लक्षचे विकासकाम करण्यास बजेट नाही.वर्षभरात रस्त्याची कामे झाली नाही असे असतांना एवढा खर्च का करीत आहे यातूनच विकास कामे करावी.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या गरवारे स्टेडीयम येथे जलतरण तलाव बांधणेच्या रक्कम रू.२.५० कोटीच्या अंदाजपत्रकास मंजूरी देण्यांत येते. सदरील प्रकल्पासाठी अर्थसंकल्प सन २००६-०७ अंतर्गत र.रू.१.०० कोटी उपलब्ध असुन उर्वरीत र.रू.१.५० कोटीची तरतुद अर्थसंकल्प सन २००७-०८ या आर्थिक वर्षात करण्यात यावी. सदर प्रकल्प शक्यतो १ वर्षात पुर्ण करण्यात यावा. सदर प्रकल्प पुर्ण झाल्यानंतर त्याची दैनंदिन देखभाल दुरूस्ती आणि प्रकल्प सुस्थितीत ठेवण्याची जबाबदारी स्वखर्चाने पुढील ३ वर्षापर्यंत संबंधित नियुक्त मक्तेदाराची राहील.

सदर प्रकल्पा करीता नियुक्त मक्तेदार/ कंत्राटदारास काम प्रगतीपथावर असतांना प्रत्येक दरम्यान देयका पैकी ७७% रक्कम अदा करण्यात येईल. तसेच नियोजीत काम पुर्ण झाल्यानंतर संबंधिताच्या देयकातून सुरक्षा ठेव म्हणून राखुन ठेवलेल्या २३% रक्कमेपैकी ५% रक्कम संबंधीत देयकाच्या १ वर्षाच्या कालावधीनंतर ६% रक्कम २ वर्षाच्या कालावधीनंतर,७% रक्कम ३ वर्षाच्या कालावधीनंतर व उर्वरीत ५% रक्कम प्रकल्प सुस्थितीत महानगरपालिकेस हस्तांतरीत केल्याच्या ९० दिवसानंतर अदा करण्यात येईल.

प्रकल्प ३ वर्ष देखभाल दुरूस्ती सह सुस्थितीत ठेवण्याकरिता मक्तेदारास/एजन्सीला येणारा खर्च भागविण्या करीता विकसीत केलेल्या सर्व सोई सुविधांचा लाभ घेणाऱ्या ग्राहकाकडून (महानगरपालिका यांचा भाग सोडून) महानगरपालिकेतर्फे सिध्दार्थ जलतरण तलाव येथे जे शुल्क आकारण्यात येते त्यानुसार शुल्क आकारणी करून तसेच वार्षिक सदस्यत्व, मासीक सदस्यत्व, दैनिक शुल्काव्दारे वसुल करू शकेल. आजीवन सदस्यत्वापोटी जमा होणारी पूर्ण रक्कम कंत्राटदारास महानगरपालिका फंडात जमा करावी लागेल. तसेच सौन्ना व स्टीम बाथ, स्कॉश कोर्ट, आधुनिक जिम्नॅशियम करीता वेळोवेळी महानगरपालिकेने ठरवून दिलेल्या दरानुसार शुल्क आकारणी करून सर्व जमा होणाऱ्या शुल्कातून प्रकल्पालगत अस्तित्वात असलेल्या दोन बॅडमिंटन कोर्टची लाकडी फ्लोरींग बदलुन अत्याधुनिक पध्दतीचे फ्लोरींग असलेले बॅडमिंटन कोर्ट उभारण्यासाठी स्वत:ची रक्कम रूपये १५.०० लक्ष इतका खर्च करावा लागेल. सदर खर्चाचा परतावा महानगरपालिका देणार नाही. सदर खर्च प्रतिकोर्ट साठी प्रतिमहा, प्रतितास रूपये १०००/- शुल्क आकारणी करून ३ वर्षाच्या कालावधी पर्यंत मक्तेदाराने/एजन्सीजधारकाने वसुल करावा यानुसार प्रस्तावास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. ६५३/२ :</u>**

आयुक्त महानगरपालिका प्रस्ताव सादर करीत आहे की, सिडको एन-८ येथे बोटानिकल गार्डन विकसीत करण्याचे र.रू.२.१५ कोटीच्या अंदाजपत्रकास तसेच सदर काम बी.ओ.टी पध्दतीने विकसीत न करता महानगरपालिकेच्या माध्यमातून उपलब्ध तरतुदीतून आणि पुढील कामासाठी जसजशी तरतुद उपलब्ध होईल त्याप्रमाणे विकसीत करण्याच्या प्रस्तावास दिनांक ११.८.२००६ रोजीच्या मा.सर्वसाधारण सभेच्या विषय क्र.३ नुसार मान्यता मिळाल्या नुसार सदरील कामाची निविदा राज्यस्तरीय वर्तमानपत्रात मनपा/जा.क्र./ई/निविदा/६८/०६ दिनांक १.१२.२००६ अन्वये प्रसिध्दीस देण्यात आलेली होती निविदा प्रसिध्दीनुसार निविदा विक्री दिनांक ११.१२.२००६ पर्यंत एकुण १९ निविदा विक्री झालेल्या आहेत निविदा सुचना अंतर्गत असलेल्या अतिरिक्त अटी व शर्ती नुसार मक्तेदारांची/ एजन्सीजची निविदा

पुर्व बैठक दिनांक १६.१२.२००६ रोजी बोलविण्यात आली असता निविदा पुर्व बैठकीस शहर अभियंता कार्यकारी अभियंता (विड्रेइवउबां),वास्तु विशारद उपस्थित होते तसेच ८ निविदाधारक मक्तेदारांनी/एजन्सीज तसेच त्यांचे प्रतिनिधी बैठकीस उपस्थित राहून उद्यानाच्या कामासंदर्भाने/निविदेतील अटी व शर्ती संदर्भाने उपस्थित केलेल्या मुद्याबाबत सविस्तर चर्चा केल्यानुसार उद्यानाचे नियोजीत विकास कामे पुर्ण झाल्यानंतर पुढील ३ वर्षाच्या कालावधी करीता उद्यानाच्या देखभाल दुरूस्तीच्या संदर्भाने झालेल्या चर्चेनुसार उद्यानात पुर्ण करण्यात आलेल्या सर्व कामाच्या देखभाल दुरूस्तीची ३ वर्षापर्यंतची सर्व जबाबदारी नियुक्त मक्तेदाराकडे/एजन्सीकडे ठेवण्या संदर्भाने तसेच मक्तेदारास/ एजन्सीस देखभाल दुरूस्ती करिताचा येणारा खर्च भागविण्या करीता सदरील उद्यानास महानगरपालिकेच्या सिध्दार्थ उद्याना प्रमाणेच प्रवेश शुल्क,पार्किंग शुल्क,खाद्य पदार्थाचे स्टॉल,मिनी ट्रेन इत्यादी करीता भाडे आकारणी करून व या व्यतीरीक्त उभारणी करण्यात येणाऱ्या अेम्पी थिएटर ऑडीओ विज्युअल इ.करीता भाडे आकारणी करून जमा होणाऱ्या रकमेतून देखभाल दुरूस्ती पुढील ३ वर्षापर्यंत करण्याचा तसेच नियुक्त मक्तेदाराने /एजन्सीजने उद्यानातील फक्त जागा प्रत्येक वर्षी २६ जानेवारी, १ मे, १५ ऑगस्ट व ८ डिसेंबर या दिवशी महानगरपालिकेच्या कार्यक्रमासाठी विनामुल्य उपलब्ध करून देण्याबाबत निविदा पुर्व बैठकीमध्ये ठरले आहे.

करीता सिडको एन-८ येथे बोटानिकल गार्डन विकसीत केल्यानंतर पुढील ३ वर्ष देखभाल दुरूस्ती नियुक्त मक्तेदाराकडून/एजन्सीजकडून करून घेण्याचा तसेच मक्तेदारास/एजन्सीज देखभाल दुरूस्ती करीताचा येणारा खर्च भागविण्या करीता सदरील उद्यानास महानगरपालिकेच्या सिध्दार्थ उद्याना प्रमाणेच प्रवेश शुल्क,पार्किंग शुल्क,खाद्य पदार्थाचे स्टॉल, तसेच उभारण्यात येणाऱ्या मिनीट्रेन अेम्पी थिएटर, ऑडीओ विज्युअल इत्यादी करीता भाडे आकारणी करून जमा होणाऱ्या रकमेतून देखभाल दुरूस्ती करण्याचा तसेच नियुक्त मक्तेदाराने/एजन्सीजने उद्यानातील फक्त जागा प्रत्येक वर्षी २६ जानेवारी,१मे,१५ ऑगस्ट व ८ डिसेंबर या दिवशी महानगरपालिकेच्या कार्यक्रमासाठी विनामुल्य उपलब्ध करून देण्याचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभे समोर विचारार्थ तथापी मंजुरीस्तव सादर.

मा.महापौर : मा. आयुक्त या संदर्भात खूलासा करतील.

मा. आयुक्त : विषय क्र १ व २ संदर्भातील जी कामे आहे ती सिडकोचे जे महापालिकेला १५ कोटी मिळाले होते त्यातून होणार आहे. त्यातून एक एक कोटी खर्च होणार आहे व उर्वरीत रक्कम ही पूढील वर्षाच्या बजेटमधून खर्च होणार आहे.स्वामी विवेकानंद उद्यान येथील विकास करण्या संदर्भात ३ महिण्यात विषय सभागृहासमोर येईल.

श्री.संतोष खेंडके : वार्डात विकास कामे होण्या संदर्भात एक ही वर्क ऑर्डर दिली नाही.

मा. महापौर : एक निविदा करून/ फेर निविदा करून मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार, सिडको एन-८ येथे बोटॅनिकल गार्डन विकसीत करण्याच्या रक्कम रूपये २.१५ कोटीच्या अंदाजपत्रकास सुधारीत अटी/शर्तीसह मंजूरी देण्यांत येते.

सदर कामासाठी अर्थसंकल्प सन २००६-०७ मध्ये रक्कम रूपये १.०० कोटीची आर्थिक तरतूद करण्यात आलेली आहे. उर्वरीत रक्कम रूपये १.१५ कोटीची आर्थिक तरतूद येत्या सन २००७-०८ च्या अर्थसंकल्पात करण्यात यावी. अशा प्रकारे एकूण तरतूद रूपये २.१५ कोटी एवढ्या आर्थिक तरतूदीतून सदर उद्यान महानगरपालिकेने निविदा काढून विकसीत करावे.

सदर कामाच्या निविदा यापूर्वी काढण्यात आल्या असून, ती संपूर्ण निविदा प्रक्रीया रद्द करून नवीन अटी/शर्तीसह फेर निविदेची कार्यवाही करण्यात यावी.

सदर उद्यानाचे काम ज्या एजन्सीस देण्यात येईल, त्या एजन्सीने उद्यानाचे काम संपल्यानंतर पुढील तीन वर्षे उद्यानाची देखभाल/दुरूस्ती स्वखर्चाने करावी. त्यासाठी एजन्सी सिध्दार्थ उद्यानाचे धर्तीवर व मंजूर दरानुसार प्रवेश शुल्क, पार्कींग शुल्क, खाद्य पदार्थांचे स्टॉल्स लावणे, मिनिट्रेन, ॲम्पी थिएटर, ऑडिओ व्हिज्युअल हॉल इत्यादी साठी शुल्क लावून त्यातुन जमा होणाऱ्या महसूलातून उद्यानाच्या देखभाल दुरूस्तीचा खर्च करू शकेल त्यास मान्यता देण्यात येते.

प्रत्येक वर्षी २६ जानेवारी, १५ ऑगष्ट, १ मे, ८ डिसेंबर या सारख्या महत्वाच्या दिवशी महानगरपालिकेने काही कार्यक्रम उद्यानात आयोजीत केल्यास संबंधीत एजन्सीला त्या कार्यक्रमांसाठी उद्यानातील जागा/ उद्यान विनामुल्य उपलब्ध करून द्यावे लागेल.

उपरोक्त अटींचा समावेश करून फेर निविदेची कार्यवाही करण्यात यावी.

प्रस्तावास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.६५४/३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील वर्ग-४ संवर्गातील खालीलप्रमाणे कर्मचारी हे दैनिक वेतनावर कार्यरत आहेत.

| अ.क्र. | कर्मचारी यांचे नांव (सर्वश्री/श्रीमती) | पदनाम | कार्यरत विभाग | ठराविक/दैनिक वेतन |
|---|---|---|---|---|
| ०१ | विजय देशपांडे | चौकीदार | भारतमाता मंदिर | रू.१७५/- |

सदरील कर्मचाऱ्यांना प्रशासनाच्या मान्यतेनुसार कामावर दैनिक वेतनावर नियूक्ती देण्यांत आलेली आहे. संबंधितांच्या कामाच्या आवश्यकतेबाबत विभाग/शाखा प्रमुख यांनी अभिप्राय देवून मुदतवाढ देण्याबाबत शिफारस केलेली आहे. यापूर्वी त्यांना वेळोवेळी तांत्रिक खंड देवून मुदतवाढ देण्यात आलेली आहे. सध्या सदर कर्मचाऱ्यांची कामाची आवश्यकता असल्यामूळे व त्यांची मुदत दि.३०/०६/२००६ रोजी संपलेली असल्याने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (१) व (३) नुसार उक्त कर्मचाऱ्यांस दोन दिवसाचा तांत्रिक खंड देवून दि.४.७.२००६ ते दि.३१.१२.२००६ पर्यंत मुदतवाढ देण्याबाबत प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

श्री. संजय सिरसाट : प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे संबधीत कर्मचारी यांना ३१.१२.०६ पर्यत सहा महिण्याची मूदतवाढ दयायची असून आता २००७ चालू आहे. विषय समजलेला नाही खूलासा घेण्यात यावा.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय: १७५/-रू. दैनिक वेतन देण्या बाबतचा प्रस्ताव असे आणखी किती कर्मचारी आहे त्याची माहिती घ्यावी नसता पून्हा एक एक असे प्रस्ताव मंजूरी साठी येतील.असे होवू नये.

मा.महापौर : मागिल सर्वसाधारण सभेत दैनिक वेतनावरील कर्मचाऱ्याना मूदतवाढ देण्यात आलेली होती. श्री. विजय देशपांडे यांचे नाव नजरचूकीने प्रशासनाकडून राहून गेले होते त्यामूळे त्यांना मूदतवाढ देण्यात येते हा विषय मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील वर्ग-४ संवर्गातील दैनिक वेतनावरील खालील कर्मचारी यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (१) व (३) नुसार दोन दिवसाचा तांत्रिक खंड देवून दि.४.७.२००६ ते दि.३१.१२.२००६ पर्यंत मुदतवाढ देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

| अ.क्र. | कर्मचारी यांचे नांव (सर्वश्री/श्रीमती) | पदनाम | कार्यरत विभाग | ठराविक/दैनिक वेतन |
|---|---|---|---|---|
| ०१ | विजय देशपांडे | चौकीदार | भारतमाता मंदिर | रू.१७५/- |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६५५/४ :**

शासनाने औरंगाबाद शहरासाठी प्रजनन व बाल आरोग्य सेवा टप्पा -२ (आरसीएच फेज-२) राबवण्यासाठी पत्र क्रमांक एस.एफडब्ल्यु/ईसीएसआयपी/डी-७/एक्सटेशन/२८३९-४१/२००५ दिनांक १८.०५.२००६ व शासन निर्णय कुका १००५/५८४/सीआर/१०१/०५ एफडब्ल्यु-१/दिनांक २६ सप्टेंबर २००६ कळवले आहे. सदरील शासन निर्णयानुसार (अॅब्रेला) एकात्मिक आरोग्य व कुटूंब कल्याण सोसायटी स्थापन करावयाची आहे. सदरील सोसायटीचे मनपा आयुक्त हे पदसिध्द अध्यक्ष आहेत. व आरोग्य वैद्यकीय अधिकारी हे पदसिध्द सदस्य सचिव आहेत.

**उद्दीष्ट :-** सर्वांसाठी आरोग्य या धरर्तीवर प्रकल्पाचा कृती आराखडा तयार करण्यात आला आहे. मुख्यत्वे शहरातील स्लम भागासाठी सर्वंकष प्रजनन व बाल आरोग्य सेवा पुरविण्यात येणार आहे. यामध्ये खालील प्रमाणे आरोग्य सेवांची विभागणी करण्यात आली आहे.

प्रथम टप्पा (First tier) :- बाह्य रूग्ण विभागाच्या प्राथमिक स्वरूपाच्या आरोग्य सेवा व सर्व राष्ट्रीय कार्यक्रमाची अंमलबजावणी करणे.

दुसरा टप्पा (Second tier) :- बाह्य रूग्ण,अंतर रूग्ण,बाळांतपण,गर्भपात,कुटूंब कल्याण शस्त्रक्रिया, प्रयोगशाळा चाचण्या,नवजात शिशूच्या प्राथमिक स्वरूपातील सेवांचा समावेश असणार आहे.

तिसरा टप्पा (Third tier) :- गुंतागुंतीच्या रूग्णांसाठी संदर्भ सेवा

या अंतर्गत खालील आरोग्य सेवाचा अंतर्भाव करण्यात आला आहे. प्रकल्पाचा कालावधी दिनांक १ जानेवारी २००७ ते दिनांक मार्च२०१०पर्यंत आहे.सदरहू प्रकल्पाचे स्वरूप थोडक्यात खालील प्रमाणे आहे

१. ९ नविन नागरी आरोग्य केंद्राची स्थापना करणे .

२. किशोरवयीन मुले -मुलीकरीता आरोग्य सेवा सत्र सुरू करणे.

३. ४० वर्षाच्या वरील लाभार्थीसाठी विशेष आरोग्य सेवा सत्र सुरू करणे.

४. अधिकारी व कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण

५. आरोग्य विषयक जनजागृती कार्यक्रम

त्यानुसार आवश्यकते मनुष्यबळ, औषधी साहित्य व सामुग्री खरेदी, सदरील खर्चासाठी तरतुद प्रकल्पा अंतर्गत करण्यात आली आहे. याकरिता नविन नागरी आरोग्य केंद्राकरिता शासनाच्या प्रमाणकानुसार ९ वैद्यकीय अधिकारी ,३६ परिचारिका,९लिपीक,व ९ सेवक/सेविका यांची नेमणूक केली जाणार आहे.

यापैकी आस्थापनावरील (पदावरील) होणारा खर्च शासनाच्या सूचनेनुसार खालील प्रमाणे शासनाकडून अनुदान प्राप्त होणार आहे.

१ जानेवारी ०७ ते ३१ मार्च २००७-१०० टक्के शासनाकडून आर.सी.एच.२

१ एप्रिल २००७ ते ३१ मार्च २००८ -१०० टक्के शासनाकडून आर.सी.एच.२

१ एप्रिल २००८ ते ३१ मार्च २००९ - ५० टक्के शासनाकडून आर.सी.एच.२+५० टक्के महानगरपालिका

१ एप्रिल २००९ ते ३१ मार्च २०१० - २५ टक्के शासनाकडून आर.सी.एच.२+७५ टक्के महानगरपालिका

शासनाकडून मिळणारे सर्व अनुदान सदरील सोसायटी मार्फत प्राप्त होऊन वितरीत करण्यात येणार आहे. प्रकल्पाचा कालावधी संपल्यानंतर पुढील आर्थिकभार नियमीत स्वरूपात मनपास सोसावा लागेल. व रील प्रस्तावास सर्व साधारण सभेची मंजुरी मिळणे आवश्यक आहे. तसेच ह्या बाबतचे हमीपत्र शासनास सादर करावयाचे आहे. शासनाने मंजुर केलेल्या कृती आराखड्याला अधिन राहून प्रकल्प स्विकृत करण्यास्तव व प्रकल्प राबवण्यास्तव मंजुरीस्तव मा.सर्वसाधारण सभेस सादर.

ब) युरोपीयन कमिशन अंतर्गत सध्या औरंगाबाद महानगरपालिकेत कार्यान्वित असलेला प्रजनन व बाल आरोग्य प्रकल्पाचा कालावधी दिनांक ३१ मार्च २००७ रोजी संपुष्टात येणार आहे. युरोपीयन कमिशन अंतर्गत ३१ मार्च २००७ अखेर पर्यंत ठराविक वेतनाकरीता अनुदान प्राप्त होणार आहे. दिनांक ०१ एप्रिल २००७ प्रजनन बाल आरोग्य कार्यक्रम नियमित स्वरूपात राबवावयाचा आहे. या प्रकल्पांतर्गत कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांचे वेतन तसेच श्रेणीवर्धीत रूग्णालय चालविण्यासाठीचा खर्च प्रकल्प समाप्तीनंतर मनपा फंडातून करण्यात येईल.करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय: आपण सामाजिक सेवा देत आहोत परंतू उस्मानपूरा भागात पाच वर्षापूर्वीच आरोग्य केद्रांचे उद्घाटन केले होते.तो दवाखाना स. सदस्य श्री.हिम्मतराव दाभाडे यांचे वार्डात गेलेला आहे. त्यास १५ दिवसात चालू करण्याच्या दूरूस्तीसह मंजूरी देण्यात यावी.तसेच तेथे एक सुरक्षा रक्षकही नियुक्त करावे.

मा. महापौर : प्रशासनाने याची नोंद घ्यावी. व कार्यवाही करावी.

सौ. रजणी जोशी :यात लिपीक ,वैद्यकीय अधिकारी ,परीचारिका तसेच सेवक असे विविध पदे दिलेली असून लॅब टेक्नीशियनची गरज नाही का खूलासा घेण्यात यावा.

आरोग्य वैद्य. अधिकारी :जी ९ केंद्र मंजूर झालेली आहे त्याचा आकृतीबंध आहे या आकृतीबंधानूसार या ९ केंद्रांवर प्राथमिक आरोग्य सेवा देणार आहोत.

मा. महापौर : विषय क्र ४ मंजूर करण्यात येत आहे.

श्री.अ.रशिद खॉन : जून्या आरोग्य केद्रांवर डॉक्टर वेळेवर येत नाही. डॉक्टराची संख्या कमी आहे. पूर्ण वेळ काम करीत नाही.

मा. महापौर :डॉक्टर आरोग्य केद्रांवर वेळेवर जातील व रूग्णांना वेळेवर सेवा मिळतील याची प्रशासनाने खबरदारी घ्यावी तसा रिपोर्ट सर्वसाधारण सभेला सादर करावा.

श्री. संजय सिरसाट : संबधीत अधिकारी यांनी दुसऱ्या कर्मचाऱ्यावर कार्यवाही केली तर त्याचेवरही कार्यवाही होवू शकते.त्यामूळे त्यांना पूर्ण अधिकार देण्यात यावे.दवाखान्यात कर्मचारीच नाही अशी स. माजी महापौर यांची तक्रार आहे. याची प्रशासनास दखल घेण्याची सूचना करावी.

| | |
|---|---|
| मा. महापौर | : आरोग्य वैद्यकीय अधिकारी रजेवर होते १५ दिवसापूर्वीच रूजू झालेले आहे त्याची ही पहिलीच सभा आहे. शासनाने त्यांना जोपर्यत डेप्यूटेशन ठेवले तोपर्यत ते येथे कार्यरत राहतील. |
| श्री. प्रशांत देसरडा | : कर्मचाऱ्यावर मोठा खर्च होणार आहे हे कर्मचारी कंत्राट बेसीसवर का घेत नाही. |
| मा. आयुक्त | :शासनाने या शहराची लोकसंख्या विचारात घेवूनच किती कर्मचाऱ्याची आवश्यकता आहे याचा आकृतीबंध केलेला आहे. यात या कर्मचाऱ्याचा पगार १०० टक्के शासनाकडून चार वर्षात येण्याची शक्यता आहे.महापालिकेला हमी दयावी लागेल की जे काही शासनाकडून पैसे मिळाणार आहे त्यानूसार योजनेवर खर्च करत राहणार आहे. चार वर्षानंतर नवीन पोस्ट निर्माण केली तर यासाठी सर्वसाधारण सभेची ही पदे रेग्यूलाईज करण्यास मान्यता लागेल. कमेन्टमेन्टसाठी सभागृहासमोर हा प्रस्ताव आलेला आहे. हे सर्व कर्मचारी कंत्राट बेसीसवर राहणार आहे. जेंव्हा शासनाचे अनुदान बंद होईल त्यावेळी महापालिकेला नियोजन करावे लागेल. नवीन पोस्ट मध्ये नव्याने कर्मचारी येतील परंतू जुन्या शिप्टचे जे लोक आहे ते चार वर्षानंतर पुन्हा रेग्यूलर केले तर कार्यरत राहतील. लोकसंख्येनूसार कर्मचारी आरोग्य विभागात ठेवावे लागतील. |
| श्री. कैलास गायकवाड | : युरोपियन कमीशन कडून आर सीएच प्रकल्प चालविण्यासाठी सन २००६ ते १० पर्यत दोन कोटी रूपये मा. आयुक्त यांचे मदतीने उपलब्ध करून घेतले आहे. सन २००१ ला आर.सीएच प्रकल्पाची नोंदणी मा.धर्मादाय आयुक्त कार्यालयात झाली होती. त्या संबधीचे पहिले जे की १९५० चे नोंदणी प्रमाणपत्र कार्यालयाने मिळविलेले आह. दुसरे प्रमाणपत्र आणलेले आहे याचा खूलासा करावा.सन २००१ ते ०६ साठी आरसीएच प्रकल्पासाठी १.३५ कोटीचे अनुदान महापालिकेस दिले होते. त्या संबधीचा लेखा जोखा मा. धर्मादाय आयुक्त यांना सादर केलेला आहे काय? |
| आरोग्य वैद्य. अधिकारी | : आरसीएच प्रकल्पा संबधी मा. धर्मादाय आयुक्त यांचेकडे पहिल्या टप्प्या संबधीची नोंदणी केलेली आहे. खर्चाची पडताळणीही झालेली आहे. मा. आयुक्ताकडून पडताळणीही करून घेतलेली आहे. |
| श्री. कैलास गायकवाड | : अधिकारी सभागृहाची दिशाभूल करीत आहे. मिळालेल्या अनुदानाचा हिशोब दिलेला आहे का तसेच दुसरे प्रमाणपत्र मिळविण्यासाठी प्रकल्प प्रमुख यांनी काय कार्यवाही केलेली आहे. |
| श्री.संजय जोशी | : संस्था नोंदणी कायदा १९५० प्रमाणे दुसरे प्रमाणपत्र आल्याशिवाय ऑडीट रिपोर्ट त्या कार्यालयात सादर करून घेतला जात नाही.असे असतांना दुसरे प्रमाणपत्र मिळालेले नाही तर कोणत्या बेसीसवर ऑडीट रिपोर्ट दिला. |
| मा. महापौर | :दुसरे प्रमाणपत्र आलेले आहे की नाही .तसेच ऑडीट होवून धर्मादाय आयूक्त यांना सबमिट केलेले आहे की नाही याचापण खूलासा करावा. |
| आरोग्य वैद्य अधिकारी | :माहिती घेवून खूलासा केला जाईल. ऑडीट करून घेतलेले आहे. |
| श्री. कैलास गायकवाड | : दीड वर्षाच्या काळात प्रकल्प प्रमुख यांना संबधीत विभागाने तीन कारणे दाखवा नोटीस दिलेल्या आहेत. एकाही तारखेला प्रकल्प प्रमुख हजर राहिलेले नाही. व |

त्यांचा प्रतिनिधी म्हणूनही पाठविलेला नाही. यात अधिकारी कुचकामी ठरलेले असून सहा वर्षाचा हिशोब न दिल्यामूळे यात मोठा भ्रष्टाचार होण्याची शक्यता आहे. त्यामूळे संबधीत प्रकल्प प्रमुख यांना निलंबीत करून या प्रकरणाची चौकशी करावी.

डॉ. आशा बिनवडे : आरसीएच प्रकल्पासाठी जो डॉक्टर किंवा जे कर्मचारी टेक्नीकल घेतले ते कंन्ट्राक्ट बेसीसवर घेतलेले होते काय आणि किती वर्षासाठी घेतले होते.

आरोग्य वैद्य. अधिकारी :कंन्ट्राटी पध्दतीनूसार कर्मचारी घेतलेले होते तांत्रिक खंड देवून दर वर्षी पून्हा मूदतवाढ देतो. यासाठी ९ वैद्यकीय अधिकारी. ३६ परिचारीका, ९ लिपीक तसेच महिला सेविका १६० असा एकूणकर्मचारी वर्ग आहे.

डॉ. आशा बिनवडे : पूर्वी जे होते त्यांना मूदतवाढ देणार आहात की नव्याने कर्मचारी घेणार आहोत .याचा अर्थ पून्हा ३ वर्षानंतर याचा खर्च महानगरपालिकेवर पडणार आहे.

मा. महापौर : या संदर्भात महाराष्ट्र शासन व महानगरपालिका अधिकारी व सहा. संचालक आरोग्य विभाग यांची पूणे येथे बैठक झालेली होती त्या बैठकीत या शहरासाठी अनुदान दयायचे म्हणून निवडलेले आहे. दोन कोटी अनुदान मिळणार आहे. ते घ्यायचे कींवा नाही त्यासाठी सभागृहातर्फे हमीपत्र दयायचे आहे.

डॉ. आशा बिनवडे : जुन्या कर्मचाऱ्याचा ठराविक मुदतीसाठी घेतलेले होते त्यांना घेवू नये नव्याचे कर्मचारी घ्यावे.

मा. आयुक्त :आरसीएच प्रकल्प पूर्ण देशामध्ये जेंव्हा सूरू झाला त्यावेळी हि एकमेव महापालिका होती त्यास युरोपियन कमीशनने निवडले होते सीप्टसाठी सीप्टमध्ये महापालिकेला जास्त रक्क्म मिळणार होती म्हणून सन २०००-०१मध्ये सर्वसाधारण सभेने चांगला निर्णय घेवून सीप्टमध्ये सहभागीही झाले. जास्त रक्कम मिळाली. आता आरसीएच-२ प्रकल्प सुरू होत आहे सीप्टचे रक्कम जे की युरोपियम कमीशनची ती स्कीम संपल्यामूळे आता आरसीएच -२ मध्ये समावेश होत आहे. प्राथमिक शिक्षक व प्राथमिक आरोग्य याची जबाबदारी कायदयानूसार महापालिकेची आहे. कोणत्याही महानगरपालिकेकडे एवढे रक्क्म असते की पूर्णपणे हे राबवू शकतो. म्हणून आरसीएच मध्ये महानगरपालिका ही स्वत: ची जबाबदारी पार पाडण्यासाठी कमीत कमी चार वर्षापर्यत १००,७५,५० टक्के रक्कम देवून मदत करणार आहे. आरसीएच पेस - २ संपल्यानंतर जर आरसीएच्या ऐवजी दुसरी नवीन स्कीम सुरू झाली नाही तर महानगरपालिकेला बेसीक जबाबदारी म्हणून या शहराला प्राथमिक आरोग्य सुविधा दयायचीच आहे. १० लक्ष लोकसंख्येच्या या शहरासाठी किंती डॉक्टर लागतात. किती इतर कर्मचारी वर्ग लागतो. हे सर्व कर्मचारी महानगरपालिकेला स्वत: च्या खर्चाने रेग्यूलर करावे लागतील. ही जबाबदारी महानगरपालिकेची आहे शासनाकडून निधी येत असल्याने करीत आहोत.

श्री. संजय जोशी :शासन तात्पुरता खर्च करणार आहे तीन वर्षानंतरचा होणारा खर्च हा महापालिकेलाच करावा लागणार आहे.

श्री. कैलास गायकवाड :मी जो प्रश्न केलात्याचा खूलासा करावा.

| | |
|---|---|
| मा. आयुक्त | : स. सदस्यांचा प्रश्न सीप्टच्या संदर्भाने आहे. जी काही रक्क्म सीप्टची मिळते ती हप्त्याने मिळते जो पर्यंत त्याचे ऑडीट होवून प्रमाण पत्र मिळत नाही तोपर्यत दुसरा हप्ता शासनाकडून मिळत नाही. यामध्ये सीप्टचे जीतके रक्कम आलेली आहे त्याचे १०० टक्के ऑडीट झालेले आहे. ऑडीटचा रिपोर्ट धर्मादाय आयुक्ताकडे सादर केला किंवा नाही या बाबतीत रेकॉर्ड बघून माहिती देण्यात येईल. जर दिला नसेल तर यात टेक्नीकली अडचण बघून दखल घेवू. |
| मा. महापौर | : जी काही रक्कम शासनाकडून मिळालेली होती त्याचे संपूर्ण ऑडीट झालेले आहे ऑडीट झाल्याशिवाय दुसरा हप्ताच सरकारकडून मिळत नाही. शासनाकडे ते सबमिट केलेले आहे जर मा. धर्मादाय आयुक्त यांचेकडे दाखल केले नसेल तर ते तात्काळ सादर करण्यात येईल. |
| श्री. पाथ्रीकर दत्ताभाऊ | : शासनाने अनुदान दिले नाही तरी आरोग्याची जबाबदारी ही महानगरपालिकेची आहे. म्हणून शासनाची कोणतीही योजना असेल त्यांचा फायदा घेण्यात यावा. |
| श्री. संजय सिरसाट | : कर्मचारी त्यांचे मर्जीने घ्यायचे व नंतर महानगर पालिकेवर बोजा टाकाणार हे बरोबर नाही. |
| मा. महापौर | : जे डॉक्टर व इतर कर्मचारी घेणार आहे ते शासनाच्या पात्रतेनूसार घेणार आहोत. |
| श्री.संजय सिरसाट | : धर्मादाय आयुक्त यांनी प्रकल्प प्रमुख यांना तीन नोटीसेस दिलेल्या आहे ही माहिती बरोबर की चूक आहे. |
| मा. आयुक्त | : धर्मादाय आयुक्त यांनी जर नोटीस दिली असेल तर त्यांचा आम्ही सन्मान करून १०० टक्के त्याची पूर्तता केली जाईल. |
| श्री.संतोष खेंडके | : ३ वर्षानंतर याचा खर्च महानगरपालिकेला करावा लागणार आहे व तीन वर्षानंतर महापालिकेची आर्थिक परीस्थिती कशी असेल याची कल्पना आज करू शकत नाही त्यामूळे यावर अभ्यास करून पून्हा सभागृहासमोर ठेवावा हा विषय तुर्त स्थगित ठेवण्यात यावा. |
| श्री.संजय जोशी | : राजनगर भागात गरीब लोक राहतात तेथे आरसीएच एक केंद्र देण्यात यावे. |
| मा. महापौर | : कोणत्या भागात आरसीएचचे केंद्र चालू करायचे त्या बाबतीत प्रशासनाकडून प्रस्ताव मागविण्यात येईल. स. सदस्य श्री. कैलस गायकवाड यांनी धर्मादाय आयुक्त यांनी दिलेल्या नोटीसचे पेपर येथे आणलेले आहे त्या बाबतीत मा. आयुक्त यांनी तपासणी करावी नियमाने कार्यवाही करावी. |
| मा. आयुक्त | : महापालिकेचे चार पाच वर्षातील जे काम केले ते समाधान कारक आहे योग्य प्रकारे आलेले पैसे खर्च केले. जी तांत्रिक बाब राहून गेली असेल तर त्याची पूर्तता होईल. आताच कार्यवाही करावी म्हणून असे म्हणणे योग्य नसून चूक निदर्शनास आली तर प्रशासन त्याचेवर कार्यवाही करेल. |
| मा. महापौर | : या संदर्भात महापालिकेला चार कोटीचे ग्रॅण्ड आलेले आहे ते मंजूर केले नाही तर परत जाईल.म्हणून महापालिका हद्दीत राहणाऱ्या नागरीकाची आरोग्य सेवा लक्षात घेता या दवाखान्याची गरज आहे. हा ठराव मंजूर करण्यात येत आहे. |

श्री.मुजीब खान : महापालिकेच्या वतीने एक नेत्र रूग्णालय चालू करण्यात आले एक वर्षापासून तेथे डॉक्टर नाही. तेथे कुणीही कार्यरत नाही औषधी पुरवठा मागविल्या जात असून दवाखाना बंद असतांना ती औषधी कुणाला दिली जाते. याचा खूलासा करावा.

आरोग्य वैद्य. अधिकारी : बन्सीलाल नगर भागात महापालिकेचा डोळयाचा दवाखाना आहे तेथे आतापर्यंत डॉ. जयश्री कुलकर्णी हया कार्यरत होत्या आता त्यांना दुसरा पदभार दिल्यामूळे आता तिथे कूणीही नाही हे म्हणणे चूकीचे आहे. तेथे बालरोग तज्ञ डॉक्टर आहे.

श्री. संजय सिरसाट : महापालिकेच्या अस्थापनेवर डोळयाचे औषधोपचार करण्यासाठी किती डॉक्टर आहे.

आरोग्य वैद्य. अधिकारी : दोन डॉक्टर असून एक व्यवहारे म्हणून आहे.

श्री. संजय सिरसाट : डॉक्टर व्यवहारे हे एन ८ येथील दवाखान्यात असतात. स. सदस्य यांनी जी सूचना मांडली ती बरोबर असून एक वर्षापासून बन्सीलाल नगर भागातील डोळयाच्या दवाखान्यात डॉक्टर नाही.

मा. महापौर : डोळयाचे दोन डॉक्टर असून डॉ. जयश्री कुलकर्णी हयांना आरोग्य वैद्य. अधिकारी रजेवर असल्यामूळे प्रभारी चार्ज दिलेला होता. डॉ. व्यवहारे हे एन ८ येथील दवाखान्यात असतात. या दवाखान्यात नेत्र रूग्णाची कोणतीही व्यवस्था आता नाही.

श्री.संजय सिरसाट :डॉ. जयश्री कुलकर्णी यांना पदभार दिल्यानंतर त्यांचे जागेवर दुसरे डॉक्टर का नियूक्त केलेले नाही.

श्री.मुजीब खान : दीड वर्षापासून डोळयाच्या सुविधा देत आहोत म्हणून रेकॉर्डला आहे. परंतू तेथे डॉक्टरच नाही. आलेली औषधी कूठे जात आहे औषधी आल्याचे रेकॉर्डवर आहे. माझ्या माहिती प्रमाणे खाजगी मेडीकल मध्ये ती औषधी विक्री केली आहे.

मा. महापौर : महानगरपालिकेची औषधी जर बाहेरील मेडीकल मध्ये विक्री होत असेल तर हे चूकीचे असून मा. आयुक्त यांनी याची चौकशी करून संबधीतावर कार्यवाही करावी व तसा अहवाल या सभागृहासमोर देण्यात यावा.

श्री. प्रशांत देसरडा : आताच डॉ. जयश्री कूलकर्णी कार्यरत असल्याचे बोलले गेले परंतू माझ्या माहिती प्रमाणे त्यांनी स्वेच्छानिवृत्तीसाठी रजा घेतलेली आहे.

मा. महापौर : तसा अर्ज त्यांनी दिला होता परंतू मूदतीच्या अगोदरच त्यानी मा. आयुक्ताकडे विनंती केली व पून्हा माझीही भेट घेतली.

मा. आयुक्त : डॉ. जयश्री कूलकर्णी याचा स्वेच्छा निवृत्तीचा अर्ज केला होता तो त्यांनी परत घेतलेला आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,औरंगाबाद शहरासाठी प्रजनन व बाल आरोग्य सेवा टप्पा-२ (आरसीएच फेज-२) राबविण्यास तसेच एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी स्थापन करण्यास व युरोपीअन कमीशन अंतर्गत सद्या कार्यान्वित असलेला प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रम नियमित स्वरूपात राबविण्यास व या प्रकल्पांतर्गत सद्या कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांचे वेतन तसेच श्रेणीवर्धीत रूग्णालय चालविण्यासाठीचा खर्च प्रकल्प समाप्तीनंतर म्हणजेच दिनांक १ एप्रिल २००७ नंतर महानगरपालिका फंडातून करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.६५६/५ :**

आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमीतीकरण व श्रेणीवाढ करणे व नियंत्रण) अधिनियम २००१ अंतर्गत महानगरपालिका क्षेत्रातील अनाधिकृत वसाहतीमधील बांधकामे नियमाधिन करण्याची कार्यवाही प्रत्यक्ष अंमलबजावणी संदर्भाने महानगरपालिका प्रशासनाने हाती घेतली असुन प्रगती पथावर आहे. यासाठी आकारला जाणारा विकास आकार हा मा.सर्वसाधारण सभेने मान्यता दिलेल्या दराप्रमाणे आकारला जात आहे.

महानगरपालिका करमुल्य निर्धारक व संकलक विभागाकडून अनाधिकृत वसाहती मधील मिळकतधारकाना रूपये १२०/- प्रति चौ.मी. दराने अतिरीक्त जमीनीचा कर आकारला जात असून त्याची पांच समान हप्त्यामध्ये वसूली केली जाते.

गुंठेवारी अंतर्गत आकारला जाणारा विकास आकाराने कर मुल्य निर्धारक व संकलक विभागाकडून आकारला जाणारा '' अतिरीक्त जमिनीचा कर '' या दोन्ही कराचा उद्येश अनाधिकृत वसाहतीमधील मिळकतधारकांना सोयी सुविधा पुरविणे हाच आहे. करिता मिळकतधारक व स.नगरसेवकांनी हा आकारला जाणारा कर दोन वेळा आकारला जातो तो रद्य करावा अशी मागणी केली आहे. त्यानुषंगाने मा.सर्व साधारण सभा दि. १८.२.२००६ मध्ये दि. २१.१.२००६ रोजीचे मा.सर्व साधारण सभेचे इतिवृत्त कायम करण्यात आले असून त्याप्रमाणे मा.महापौर महोदयानी ज्या मिळकतधारकांनी कर मुल्य निर्धारन विभागातर्फे आकारण्यात आलेला अतिरीक्त जमिनीचा कर किंवा त्याचा हप्ता जमा केला असेल तर तो गुंठेवारी अंतर्गत आकारण्यात येणाऱ्या विकास आकारात समायोजित (वजा)करावा असे निर्देश दिले आहेत.

तथापी कर मुल्य निर्धारक व संकलक विभागा अंतर्गत आकारण्यात आलेल्या अतिरीक्त जमिनीचा कर (रू.१२०/-प्र.चौ.मि.) ज्या मिळकतधारकांनी जमा केला असेल तर त्यांची भरलेली रक्कम ही गुंठेवारी अंतर्गत आकारण्यात येणाऱ्या विकास आकारातून वजा करण्याचा निर्णय होणेसाठी प्रस्ताव सर्व साधारण सभेसमोर विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर करण्यात येत आहे.

श्री.अ.रशिद खान : गुंठेवारी भागात गुंठेवारी व्यतिरिक्त आणखी काही अनधिकृत घरे असतील ती आरक्षण असलेल्या जागेवर आहे ते लोक पैसे भरण्यास तयार आहे रेग्यूलाईज करून घ्यावे असे करता येते का याचा खूलासा करावा.

मा. महापौर : अशी कोणती अनधिकृत वसाहत आहे की ती गुंठेवारीत रेग्यूलाईज करता येईल त्याची मा. आयुक्तांनी माहिती घेवून कार्यवाही करता येईल.का ते तपासावे.

श्री.संतोष खेंडके : पुंडलिकनगर ही वसाहत १९९५ पासूनची आहे. तेथील नागरीकाकडे त्यावेळचे खरेदीखत आहे एकाच मालमत्तेचे चार वेळेस खरेदीखत आहे.ज्यांनी १९८८ किंवा १९९५ मध्ये ती जागा घेतलेली आहे ते ओनर कडील कागदपत्र संबधीत लोकाकडे नसतात त्यामूळे जो ओनर आहे ते लेटेस्ट जे खरेदीखत आहे ते सादर करीत आहे .त्यामूळे जी सर्वे करणारी एजन्सी आहे ते घर रेग्यूलाईज करण्यास संचिका सादर करून घेत नाही.यात काय तोडगा काढता येईल तो काढावा नसता एक प्रस्ताव तयार करून शासनाकडे पाठविण्यात यावा व सन २००५ पर्यत असलेल्या सर्व गुंठेवारीच्या वसाहती रेग्यूलाईज करण्यात याव्यात.

सौ.लता दलाल : सदर वसाहत केंव्हापासूनची आहे याचा रेकॉर्ड महापालिकेकडे असेलच त्यामूळे त्या भागातील जे सध्याचे ओनर आहे त्याची संचिका गुंठेवारीत रेग्यूलर करण्यासाठी सादर करून घेण्यात यावी.

श्री.नारायण कुचे : ज्या एजन्सीकडे ज्या ज्या भागातील काम दिले असेल त्या एजन्सीने ७५१ रूपये जमा करून घ्यावे व संबधीत नागरीकांच्या गुंठेवारीत रेग्यूलर करण्यासाठी संचिका सादर करून घ्यावेत.रहिवासी प्रमाणपत्र देतात. शिधा पत्रिका लोक देत आहे परंतू लाईट बिलाची मागणी सर्वे करणारी एजन्सी करीत आहे. असे असेल तर रहिवासी पत्ता म्हणून काय गृहीत धरणार आहात.

मा. आयुक्त : स. माजी महापौर श्री.अ. रशिद खॉन यांनी म्हटल्या प्रमाणे जर २०००च्या पूर्वी कोणत्या आरक्षीत जागेवर बांधकाम झाले असेल तर ते प्लॅनींग आर्थटींच्या मान्यतेने ते रिजर्वेशन डिलीट होवू शकते. तर ज्या आरक्षीत जागेवर सन २००१ च्या पूर्वी बांधकाम झालेले आहे ते डी. पी रोड रद्द करण्यासाठी सर्वसाधारण सभेची मान्यताघ्यावी लागेल. जर मान्यता दिली तर अशा आरक्षणा क्षेत्रामधे सन २००१ च्या पूर्वी बांधकाम झालेले असेल तर ते नियमित करणे सूलभ होईल. गुंठेवारी मध्ये बांधकाम रेग्यूलाईज करत आहोत. व्यक्तीची ओनर रेग्यलाईज करीत नाही. ज्यांचेकडून विकत घेतले त्यांनी २००१ च्या पूर्वी बांधलेले असेल परंतू हे सिध्द करावे लागेल की सदर घर हे २००१ च्या पूर्वीच बांधलेले होते. सदर घर हे २००१ पूर्वीच बांधलेले आहे असा कोणताही पूरावा असेल तरी चालेल.

सौ.लता दलाल : जर २००१ पूर्वीप्लॉट घेतलेला असेल व त्यानंतर घर बांधले असेल तर त्याचाही विचार करावा.

मा. आयुक्त : बाधांकाम २००१ पूवीचे असावे. जेंव्हा गुंठेवारी कायदा अस्तीत्वात आला त्यावेळी ओपन प्लॉट हा रेग्यूलाईज करावयास पाहिजे होता व त्यानंतर रितसर बांधकाम परवानगी घेवून बांधकाम करावयास पाहिजे होते. गुंठेवारी करतांना १० टक्के ओपनस्पेस सोडण्यात आलेली नाही त्यामूळे कायदा म्हणून कायदा असा पण म्हणतो की कोणत्याही क्षेत्रामध्ये गुंठेवारी झाले असेल तर आताचा जो आरक्षीत भाग आहे तो आपोआप महानगरपालिकेच्या मालकीचा होवू शकतो. आणि त्या भागात आरक्षण व ओपनस्पेस ॲडजेस करायची असते. जर प्लॉट २००१ पूर्वीचे होते त्यानंतर बांधकाम झाले असेल तर त्यास रेग्यूलाईज करण्यासाठी असे प्रकरण शासनाच्या मान्यतेने कार्यवाही करता येईल. बाधंकाम हे २००१ च्या पूर्वीचे असल्यामूळे जो कंपाऊडींगचा ठराव मंजूर केला त्या अंतर्गत त्या अनधिकृत बांधकामाना रेग्यूलाईज करायचे या बाबत कायदेशीर तपासणी करून घेवून कार्यवाही केली जाईल. परंतू त्यामध्ये एफ एस आय रेग्यूलाईज होणार नाही.

श्री. नारायण कुचे : गुंठेवारी भागातील नागरीक बॉण्ड लिहून देत आहे की २००१ पूर्वीपासून येथे राहतो तेव्हापासून चे तो पत्ता गृहीत का मानला जात नाही.

| | |
|---|---|
| मा.महापौर | : सन २००१ पूर्वी बॉण्ड पेपरवर जर लिहून देत असेल तर त्या घरांना रेग्यूलाईज करण्यास हरकत नसावी. |
| मा. आयुक्त | :सन २००१ पासून जर रहिवासी असेल तर त्यांचे मतदार यादीत नाव असेल तसेच तेथील पत्ताही असेल अशी कागदपत्र गुंठेवारी रेग्यूलाईज करण्यास गृहीत धरण्यात येतील. |
| श्री. संतोष खेंडके | : पूंडलिक राऊत हे मयत झालेले होते. त्यांचे नावानेच पूंडलिकनगर ही वसाहत झालेली आहे. ही वसाहत कोणत्या वर्षी पासून अस्तित्वात आहे हे प्रशासनाने बघावे. |
| श्री.प्रशांत देसरडा | : सर्वे करणारी एजन्सी नागरीकांकडून ७५१/-रु भरणा कस्न घेत आहे. त्या रहिवाशांना चलन दयावयास पाहिजे काही लोकांना चलन दिले नाही.किंती लोकांना दिलेले नाही . |
| सौ. मेहरून्नीसा खान | : शहरात ५२ ऐतिहासिक दरवाजे आहे. शफील ही आहे. यामध्ये जे वार्ड येते ते गुंठेवारीत येत नाही. गावठाण भाग आहे. सन १९१४ मध्ये येथे गावठाण म्हणून घोषित करण्यात आले होते.जे गुंठेवारीत येते त्या नागरीकांना तीन हप्त्यात रक्कम भरण्याचे ठरवून दिले. परंतू गरीब लोक भरू शकत नाही.आणखी हप्ते वाढवून दयावे. |
| श्री.शंशाक विसपूते | : गुंठेवारी तात्काळ होण्यासाठी एजन्सी नियुक्त केल्या ७५१/-रू. भरून घेतांना एजन्सीने चांगले काम केले परंतू ज्यांनी मागिल फेब्रुवारी मध्ये रक्कम भरणा केली त्या नागरीकांना अद्याप चलन दिले नाही.सचिंका तयार होत नाही दिरंगाई होते. याबाबतीत ठोस निर्णय घेण्यात यावा. |
| श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर | : एजन्सीवर नियंत्रण ठेवण्यासाठी महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यानी नियुक्ती करावी. एक महिण्यात गुंठेवारीचे काम करण्यात यावे. दुसऱ्या टप्प्यात बाकीचा भाग गुंठेवारीत घ्यावा. या शहरातील लोकांना बॉण्डवर घरे विक्री होवून फसवणूक केलेली आहे. व पुन्हा गुंठेवारीत होण्यासाठी तसा प्रकार होवू नये म्हणून त्याची दखल घेण्यात यावी. |
| श्री.मुजीब खान | : गुंठेवारी कायदा शासनाने लागू केला त्याची प्रत सदस्यांना देण्यात आलेली नाही. शहरात गुंठेवारीचा भाग कोणता येतो व कोठे वसूल करण्याचे सूचीत केले त्याचीही यादी स. सदस्यांकडे दिलेली नाही.हे शहर २०-२५ वर्षापूर्वीचे नसून शहराच्या शफील च्या अंतर्गत भाग व काही बाहेरील भाग जसे किराडपूरा तसेच उस्मानपुरा भाग बाहेरील भाग येतो. अशा प्रकारचा सर्वे प्रशासनाने यापूर्वी करावयास पाहिजे होता या संदर्भात अनेक वेळा सभागृहात चर्चाही झालेली होती. त्यासाठी शहरातील कोणकोणता भाग हा गुंठेवारीत येतो व कोणता गावठाण मध्ये येतो. याची माहिती घेणे आवश्यक आहे. एक व्यक्ती गुंठेवारीचे पैसे भरण्यास तयार होते.त्यास सब डिव्हीजन घेवून यावे म्हणून म्हटले. सातबारावरील जागा ही सब डिव्हीजन मधील नसते. संबधीत व्यक्तीला दोन तीन दिवस चकरा माराव्या लागल्या गुंठेवारीची जागा ही सातबारावरील आहे लिगल नाही. ही कोणत्या पध्दतीने अमलबजावणी होत आहे कळायला मार्ग नाही.कोणत्या भागातून किती व |

कोणाकडून एजन्सीने किती रक्क्म वसूल केली याचे रेकॉर्ड प्रशासनाकडेही नाही. कमेटी तयार करून सर्वे केला तर किती रक्कम एजन्सीने वसूल केली हे कळेल. जी जुनी वसाहत आहे ती गावठाण म्हणून आहे. ती कोणती वसाहत आहे ते डिक्लेर करावे.शासन गुंठेवारी करण्याच्या सूचना करतात परंतू अधिकारी हे अडथळे निर्माण करीत आहे.

मा. महापौर : जर सातबारा मध्ये सब डिव्हीजन ची मागणी होत असेल तर ते मिळत नाही. त्यामूळे गुंठेवारी रेग्यूलाईज करण्यासाठी सब डिव्हीजनच्या अटीची गरज नाही. शासनाकडून जो गुंठेवारीचा कायदा आलेला आहे त्याची एक प्रत सर्व सदस्यांना देण्यात यावी.

सहा. संचालक(न.र.) : दिनांक २७.१२.२००६ पर्यत एकूण ४४,०३५ घराचा सर्वे झालेला असून त्या पैकी ३६,३०० घर मालकांना नोटीसेस देण्यात आलेल्या आहे. रूपये ७५१ भरणा करून एजन्सीकडे ११,४६५ संचिका झालेल्या आहेत. एजन्सीने वार्ड कार्यालयाकडे दाखल केलेल्या संचिका ७,६३८ आहे.त्यापैकी वार्ड कडून दिलेली चलन संख्या ४,३२७ आहे ५० , १०० टक्के चलन भरून वार्ड कडे तयार सचिका १२५५ आहे.त्यापैकी वार्ड कडून गुंठेवारी कक्षास ८३१ सचिंका प्राप्त झालेल्या आहेत. त्यापैकी ६०० सचिंका मंजूर करण्यात आलेल्या आहे. ८७ संचिका नामंजूर करण्यात आलेल्या आहे. कार्यावाही अंतर्गत १४४ संचिका आहे.

श्री.प्रशांत देसरडा : ४४ हजार पैकी जर १२५५ लोकाना नोटीसा दिले असेल तर प्रशासन काय काम करते.

मा. आयुक्त :४४ हजार घरे हे गुंठेवारीमध्ये आढळली. यातील १०० टक्के मिळकत ही २००१ च्या पूर्वीची नाही. त्यानंतरची काही मिळकत आहे. यापैकी लगबग २५ हजार लोकाना नोटीसेस दिल्या पहिली नोटीस ७५१ रूपये भरून आपली संचिका करून घ्यावी म्हणून नोटीस दिली. ७५१ रूपये भरणा करून एजन्सीकडे एकूण ११४६५ संचिका प्राप्त झाल्या.बाकीच्या लोकांनी नोटीस देवून सुध्दा ७५१ रूपये भरणा केलेले नाही. त्यामूळे अशी घरे तोडण्याची कार्यवाही सुरू करावी म्हणून मागिल आठवडयात तसे आदेश दिलेले आहे.यापैकी एजन्सीने ७६३८ संचिका वार्ड कार्यालयाकडे सादर केल्या वार्ड कार्यालयाने पूर्ण सचिका तपासणी करायची व चलन दयायचे चलनचे कमीत कमी ५० टक्के रक्क्म भरल्यानंतर संचिका पूढील कार्यवाहीसाठी जाईल. वार्ड कार्यालयाकडून ४००० लोकांना चलन दिले. यापैकी १२५५ लोकांनी चलन भरणा केले. यापैकी ८३१ संचिका अंतिम होवून प्रशासनाकडे प्राप्त झाल्या त्यापैकी ६०० मंजूर केलेल्या असून १४४ प्रोसेसमध्ये आहे. ८७ नामंजूर केलेल्या आहेत. जे ही कुणी नागरीक यांनी ७५१रूपये भरणा केले म्हणून संचिका मंजूर झाली असे नाही.२००१ नंतरचे घर असेल व ७५१ भरणा केले असे तर ७५१रू. भरणा करून घेवून संचिका पूर्ण करून घेवू.शासनाचे जे २००१ चे नंतरसाठी मुदत येत नाही.तोपर्यत संचिका प्रशासनाकडे ठेवू.

श्री.संजय सिरसाट : ७५१ रूपये घेतांना संपूर्ण संचिका तपासणी करणे आवश्यक आहे. जर २००१ च्या नंतरचे घर असेल तर ७५१ रूपये कशाचे बेस घेतले जातात.

मा.आयुक्त : ७५१ पैकी ५१ भारत सरकारचा टॅक्सेस आहे. २००रूपये ॲफिडेव्हिटचे आहे. ५०० रूपये एजन्सीची फीस आहे.

श्री.संजय सिरसाट : ज्यावेळी एजन्सीचा कर्मचारी संचिका सबमिट करून घेतो त्यावेळी सर्व कागदपत्र तपासले पाहिजे. खात्री पटली तरच ७५१ रूपये घेतले पाहिजे.

मा. आयुक्त : तरी पण घ्यायला नको ते त्या व्यक्तीवर सोडले पाहिजे की त्यांना ते भरायचे असेल तर भरतील नसता नाही. २००१ ची संचिका सबमिट करण्यास प्रशासनास कोणते रहस्य नाही परंतू सभागृहाचे तसे मत झाल्यानूसार ७५१ रूपये भरणा करून घेवून व सर्वसाधारण सभेच्या निर्णयानंतर शासनाकडे पाठवून पूढील कार्यवाही करू.

श्री.भगवान घडमोडे : खालचे अधिकारी कर्मचारी गुंठेवारी रेग्यूलाईज करण्यामध्ये दखल घेत नाही. ज्यांना नोटीसा दिल्या ज्या लोकांनी चलन भरणा केले त्या संचिका हाताळण्यास अधिकारी कर्मचारी इच्छुक नाही. त्यामूळे ज्यांची संचिका सादर झाली त्याचे बद्दल कार्यवाही होत नाही म्हणून इतर ही लोक गुंठेवारीत येण्यास पूढे येत नाही.दोन दोन महिने संबधीत एजन्सी चलनच देत नाही त्यामूळे पूढील कार्यवाही होत नाही. कागदपत्राची खात्री झाल्यानंतर किती दिवसात चलन देणे आवश्यक आहे .

मा. आयुक्त : एक महिण्याची मूदत दिलेली आहे. चलन देण्याच्या पूर्वी पूर्ण कागदपत्राची पूर्तता संबधीत व्यक्तीच्या कडून घ्यायची आहे. त्यांचेकडे अनेक वेळा जावूनही पूरावा मिळत नाही सही करीत नाही.

श्री.भगवान घडमोडे : प्रशासनास खालचे अधिकारी चूकीचीमाहिती देतात. मी संबधीत एजन्सीशी संपर्क करून माझ्या वार्डातील संचिका करून घ्यावे व मी स्वत: कागदपत्राची पूर्तता करून दिली. त्यानंतर सूध्दा तात्काळ चलन देण्यात आले नाही. संचिका तयार करून उपयोग नाही अशी त्या लोकांची मागणी झालेली आहे.त्याची ज्यांनी ७५१ रू. भरणा केल्यानंतर त्या लोकांना तात्काळ चलन देण्याची कार्यवाही करावी.

मा. महापौर : ज्यांनी ७५१ रू. भरणा केले. एक महिण्याचा वेळ दिलेला आहे. ताबडतोब चलन दिले पाहिजे.

मा. आयुक्त : ७५१रू. भरणा केले जर ते घर २००१ चे नंतरचे असेल तरी त्यास चलन मिळणार नाही. यामध्ये ५० टक्केची तफावत दिसणार आहे. ५० टक्केमध्ये झालेले बांधकाम हे त्यातील ३० ते ४० टक्के नंतरचे असते.

मा.महापौर : सभागृहाच्या भावना लक्षात घेवून असे लक्षात येते की ७५१ रू. भरणा करूनही त्या नागरीकांना चलन मिळत नाही. त्यासाठी मा. आयुक्त यांना सूचित करतो की गुंठेवारीचे काम पाहण्यासाठी एक अधिकारी नियुक्त करावे ते अधिकारी संबधीत एजन्सीकडून माहिती घेवून कार्यवाही करतील.

श्री.भगवान घडमोडे :जो भाग १९९५ किंवा १९९० मध्ये विकसीत झाला असेल व त्यामध्ये काही प्लॉट रिकामे असतील अशा प्लॉटचे गुंठेवारीत रेग्युलाईज करावे.

मा.महापौर : एखादा गुंठेवारी भाग पूर्ण विकसीत झाला घरे झाली असेल व एखादा प्लॉट खाली असेल तर त्यास रेग्यूलाईज करण्यासाठी कार्यवाही करावी.हा विषय मंजूर करण्यात येतो.

श्री. संतोष खेंडके : गुंठेवारी कायदा लोकांनी मान्य केलेला आहे. ३६हजार संचिका दाखल होतात. तरीही कार्यवाही होण्यास वेळ लागतो यात प्रशासनाची की एजन्सीची चूक आहे याची चौकशी व्हावी. गुंठैवारी रेग्युलाईज होण्यास जो उशीर होत आहे त्यास कारण असे की जे ओनर बदलले आहे त्यामूळे अडचण येत आहे.

श्री.शंशाक विसपूते : काही भागात असे दिसून येते की काहींना गुंठेवारीत यायचे नाही व दुसऱ्यानाही करू दयायचे नाही. ज्यांनी दोन मजली घरे बांधली आहे त्याची इच्छा गुंठेवारीत येण्याची इच्छा नाही. चलन देवून जे नागरीक पैसे भरण्यास तयार नाही अशाच्या बाबतीत प्रशासनाने कठोर निर्णय घ्यावा.

मा. महापौर :७५१ रू. भरणा केल्यानंतर चलन देणे गरजेचे आहे.ते घर रेग्युलाईज होण्याची गरज आहे.

श्री.पुरूषोत्तम ठाकूर : अनेक वेळा या विषयावर चर्चा होते. या बाबतीत प्रशासन कोणतीही ठोस कार्यवाही करीत नाही. गुंठेवारी कायदा लोकांनी मान्य केला अनेक लोकांनी ७५१ रू. भरणा केले. असे असतांना सूध्दा त्या संबधीत एजन्सीशी नागरीकांना संपर्क साधता येत नाही. त्या एजन्सीचे कार्यालय कूठे आहे माहिती नाही. गुंठेवारी संदर्भात नागरीकांची वेगळी चर्चा होत आहे. या बाबतीत आपण जातीने लक्ष देवून अमलबजावणी करावी.

मा. महापौर : स. सदस्य श्री. ठाकूर यांनी मोलाची सूचना केलेली आहे प्रशासनाने याची नोंद घेतलेली असून त्याची अमबजावणी करावी हा विषय मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार कर मुल्य निर्धारक व संकलक विभागाकडून आकारण्यात आलेला अतिरीक्त जमिनीचा कर (रू.१२०/-प्र.चौ.मी)प्रमाणे मिळकत धारकांनी भरणा केला असेल तर ती रक्कम गुंठेवारी अंतर्गत आकारण्यात येणाऱ्या विकास आकारात वळती करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६५७/६ :**

मालमत्ता कर व पाणीपट्टी वसुली बाबत चर्चा करणे.

श्री.संजय सिरसाट : वसूली संदर्भात मा. आयुक्त व इतर अधिकारी यांना आपसात चर्चा करायची आहे त्यासाठी या सभागृहाची मान्यता लागते असे एकदंरीत विषयावरून दिसते. मान्यता देण्यात यावी.

मा. महापौर :तसा विषय नाही. शहरातील विकास कामे होण्यासाठी निधी आवश्यक आहे.मालमत्ता कर व पाणीपट्टी वसूली होणे आवश्यक आहे.

श्री.संजय सिरसाट : एका ओळीत दिल्यावर त्यावर काय चर्चा करायची.

श्री.मुजीब खान : प्रस्ताव चूकीचा सादर केलेला आहे वसूली संदर्भात प्रशासन या सभागृहाला चर्चा करण्याच्या सूचना करीत आहे हे बरोबर नाही.

मा.महापौर : वसूली संदर्भात प्रशासन निवेदन करेल. वसूली का झाली नाही काय अडचणी येतात याचा जाब आपण प्रशासनास विचारावा.

श्री.प्रशांत देसरडा : हा प्रस्ताव प्रशासनाने ठेवलेला आहे प्रशासनाकडून खूलासा घेण्यात यावा.

मा. महापौर : मालमत्ता कर व पाणीपट्टी वसूली संदर्भात काय अडचणी आहे त्या संदर्भात चर्चा करण्यासाठी तसा प्रस्ताव ठेवावा म्हणून प्रशासनास सूचना केलेल्या होत्या.किती व टारगेट नूसार का वसूली झालेली नाही याची माहिती प्रशासन देईल.

श्री. काशिनाथ कोकाटे : सन २००६-०७ च्या अर्थसंकल्पातील वसूली संदर्भात चर्चा करण्यासाठी हा विषय आलेला आहे या अर्थसंकल्पात जे विकास कामाचे अंदाजपत्रक ठेवण्यात आलेले होते. त्यापैकी १५ते२० टक्केही कामे सुरू झालेली नाही.जनतेसाठी कोणतीही कामे झालेली नाही .

श्री.मुजीब खान : या विषयावर चर्चा करावी म्हणून तसा म्हणण्याचा अधिकार प्रशासनास नाही वसूली करण्याचे काम प्रशासनाचे असते सभागृहाचे नाही. मा. आयुक्त यांनी चूकीचा प्रस्ताव ठेवलेला आहे.

श्री. वसंत नरवडे : या प्रस्तावाला सूचक नाही अनुमोदक नाही म्हणून यावर चर्चा करण्यास विरोध होत आहे. या विषयासंबधी प्रशासनाचे काय मत आहे खूलासा घेण्यात यावा.

श्री.रेणुकादास वैद्य : या विषयावर विषेष सभा घेण्यात यावी.

श्री.संतोष खेंडके : या विषयावर विशेष बैठक आयोजित करावी.

श्री.काशिनाथ कोकाटे : विषय ज्या पध्दतीने यावयास पाहिजे होता त्या नूसार आलेला नाही. असे असले तरी चर्चा होणे आवश्यक आहे. सन २००६-०७ चे जे बजेट तयार करण्यात आले होते. वार्डातील विविध विकास कामे करण्याच्या संदर्भाने बजेट केले होते. चिकलठाणा औद्योगिक वसाहतीच्या माध्यमातून महानगरपालिकेला जवळपास ४५ कोटीचे उत्पन्न जकातीच्या माध्यमातून मिळते.औद्योगिक वसाहतीला चालना देण्यासाठी शासनाची योजना आहे. रोजगार उपलब्ध झाला पाहिजे. ३ कोटी मालमत्ता कर व पाणीपट्टीच्या माध्यमातून या भागातून उत्पन मिळते.असे असतांना आजची परीस्थिती पाहिली तर तेथे कोणतीही सूविधा दिली जात नाही असे लक्षात येते. औद्योगिक वसाहतीतील प्रत्येक रस्त्याची काय दुरावस्था झाली त्याची कॅसेट चित्रीकरण केलेली असून आपण तसेच मा. आयुक्त यांनी ती कॅसेट आवश्य मा.महापौर यांचे दालनात बघावी. शहरातीलही इतर मोठमोठे रस्ते खराब झालेले आहे. एकीकडे औद्योगिकरण करीत असतांना दुसरीकडे नागरीकांना सूविधा मिळाव्या त्यासाठी महानगरपालिकेच्या तिजोरीमध्ये पैसा आला पाहिजे म्हणून खाजगीकरण केले जाते.ज्या औद्योगिक वसाहतीमधून महानगरपालिकेला मोठया प्रमाणात उत्पन्न मिळते त्या भागात विकास कामे केली जात नाही.२० ते ३० टक्के पथदिवे चालू नाही. वखार्ड ते गरवारे तसेच महाराष्ट्र डिस्ट्रलरीज ते धूत कंपनीपर्यत १०० टक्के एमआयडीसी तील रस्ते खराब आहे. एमआय डीसी भागात ३० ते ३५ टक्के कारखाने चालू आहे रात्रीच्या वेळी कामगार जा ये करतात. मोठमोठे अपघात झालेले आहे. एपीआय सारखी कंपनी एका बिल्डरला

विक्री केली प्राधिकरण असेल तर त्यासाठी महानगरपालिकेची कोणतीही परवानगी घेतलेली नाही. तेथे वसाहत होणार तेथे जनता राहील. तेथे इतर सुविधा दयाव्या लागणार पाणी , विद्युत लाईट दयावे लागणार याचा सर्व खर्चाचा बोजा महापालिकेवर पडणार आहे. म्हणून या जागेवर विकास करण्यासाठी विकास खर्च घेतलेला आहे काय याचाही खूलासा करावा. तीन महिण्यापूर्वी एका गरीब कामगाराचा रस्त्यावर अपघात झाला तीन लक्ष त्यास शस्त्रक्रियेसाठी लागले. तो गरीब व्यक्ती होता लोकांनी मदत वर्गणी करून मदत केली. जेथे बांधकाम परवानगी नाही १० बाय १० ची टपरी बसली तर तेथे प्रशासकीय विभाग कार्यवाहीसाठी जाते वृत्तपत्रात कार्यवाही केल्याचे छापून येते. उपआयुक्तांच्या नावाने एक बातमी आली होती की ज्यांनी नळ पट्टी भरणा केली नाही तर पाणी पूरवठा खंडीत केला जाईल. तसा अधिकार नाही.१० लोकांनी नळ पट्टी भरणा केली नाही म्हणून सर्वच भागाचा पाणीपूरवठा खंडीत करणे योग्य होणार नाही.पाण्या सारखी सुविधा थांबवू शकत नाही. अशा बातम्या येते ही महापालिकेची दुर्दैवी बाब आहे. वार्ड ड चे सफाईसाठी खाजगीकरण करण्यात आले. परंतू जो कर्मचारी वर्ग आहे तो कूठे काम करतो कळायला मार्ग नाही. खाजगीकरण करून तेथील कर्मचारी इतर ठिकाणी कामाला देवून वसूली किती प्रमाणात होते आहे. जानेवारी महिना चालू आहे ७० कोटीचे टारगेट दिले असतांना १६ ते १७ कोटी वसूली आजपर्यंत होते.तर विकास होणार कसा. शासनही पैसा देणार नाही तर विकास कामे करणार कसे. जकातीचे खाजगीकरण झाले. २१ कोटी जास्त आले परंतू जकात विभागातील कर्मचारी वसूलीसाठी दिले.इतर वसूलीत का झाली नाही. विकास कामे का करण्यात आलेली नाही. वसूली करण्यास कुणी अडसर येत आहे काय सिडको भागात सुविधा देण्या अगोदर कर लादला जात आहे. हस्तातरण झाले तेंव्हा राज्य मंत्र्याच्या हस्ते झाले. मालमत्ता कर आकारतांना या बाबतीत सविस्तर चर्चा करून त्यानंतर निर्णय घेण्यात येईल असे म्हटले होते. दोन हजार ची नोटीस जाण्या ऐवजी २० हजारची नोटीसेस दिल्या आहे. असे होत असेल तर तेथील जनसमुदाय रस्त्यावर येण्याची शक्यता आहे. सर्वांना समान कर लावण्याचे ठरले होते. परंतू ज्या एजन्सीकडे काम दिले ते लोकांना त्रास देत आहे किरायदार असल्याचे दाखवून मोठया प्रमाणात कर लावण्यात येत आहे. सिडको हडको भागात कर लावण्या संदर्भात नियम केले. स्थायी समितीने मान्यता दिली त्यास मा. आयुक्तांनी मान्यताही ग्राहय धरलेली आहे.ज्या पध्दतीनेकाम व्हायला पाहिजे त्या पध्दतीने होत नाही. ज्या भागात जास्त कर आकारला जात आहे तसेच जकात खाजगीकरण होवून तेथील कर्मचारी वसूलीसाठी दिले असतांना देखील अपेक्षीत वसूली झालेली नाही. ६० ते ७० हजार मालमत्तेला कर लावलेला नाही. सर्वे केला किती मालमत्तेला कर आकारला गेला. जो कर भरतो त्याचेकडूनपून्हा कर वसूली होते. त्यांना दंड आकारला जातो हे बरोबर नाही. रस्त्याची अवस्था कशी झालेली आहे त्याची कॅसेट मा. महापौर यांचेकडे देत आहे. ती पाहण्याची व्यवस्था आपण मा. आयुक्त

यांचेसह आपल्या दालनात करावी. या भागात जवळपास ३० ते ३५ कोटीची आवश्यकता आहे व एकदा रस्ते केल्यानंतर १० ते १५ वर्ष रस्ते करण्याची गरज पडणार नाही.

श्री.संतोष खेंडके : जेष्ठ स. सदस्य श्री. कोकाटे यांनी तळमळीने प्रश्न माडलेला आहे. आतापर्यत किती वसूली झालेली आहे प्रशासनाने खूलासा करावा.

मा. महापौर : सभा १५ मिनिटासाठी तहकूब करण्यात येते (वेळ दुपारी २.२५ वा. पून्हा सभा दु. ३२५ वा.सुरू)

श्री.मुजीब खान : खूलासा करण्यासाठी कूणी अधिकारी नाही. त्यामूळे या विषयावर चर्चा करण्यासाठी विशेष सभेचे आयोजन करण्यात यावे.

श्री.संजय जोशी : २२ तारखेला सभा आयोजित करावी.

श्री.पुरूषोत्तम ठाकूर : प्रत्येक वार्डातून वसूली किती व त्या भागात विकास कामे किती झालेली आहे.खूलासा घेण्यात यावा.

मा. महापौर : येत्या २२ तारखेला मालमत्ता कर तसेच पाणीपट्टी वसूली संदर्भात चर्चा करण्यासाठी सकाळी ११.३० वा. सभा आयोजित करण्यात येईल.

सौ. दिपाली पाटील : वखार्ड कंपनीच्या बाजूला मोठे बांधकाम चालू असून सर्व माती रस्त्यावर येत आहे. दोन महिण्यापासून मी अधिकारी यांना सूचना दिली तरी कार्यवाही होत नाही. तेथे माझा अपघात सूध्दा झालेला होता. किती दिवसात कार्यवाही होणार आहे. दोन दिवसात कार्यवाही केली नाही तर सोमवार पासून मी उपोषणास बसेल.

मा. महापौर : प्रशासकीय अधिकारी यांनी ताबडतोब कार्यवाही करावी.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार या विषयावर निर्णय घेण्यासाठी दि. २२.१.०७ रोजी विशेष सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**स.सदस्यांचे प्रस्ताव**

**विषय क्र.६५८/७ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.८१ जयभवानीनगर सिडको १३ वी योजना या ठिकाणी सिडकोचे चार खोल्याचे बांधकाम झालेले असुन सध्या ते रिकामे आहे व या भागातील नागरीकांच्या आरोग्य सेवाच्या दृष्टीकोणातून या भागात जवळच कोणतेही आरोग्य केंद्र नसल्याने या भागात उपरोक्त अस्तित्वात असलेल्या चार खोल्या मध्ये महानगरपालिकेचे आरोग्य केंद्र सुरू करण्या बाबतचा प्रस्ताव येत्या सर्वसाधारण सभेत मंजुर करण्यात यावा ही विनंती.

सुचक : सौ.पुष्पा बाळुनाना शिंदे अनुमोदक :श्री.दामोधर माधवराव शिंदे, श्री. नारायण तिलोकचंद कुचे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,वार्ड क्र.८१ जयभवानीनगर सिडको १३ वी योजना या ठिकाणी सिडकोचे चार खोल्याचे बांधकाम झालेले असुन सध्या ते रिकामे आहे व या भागातील नागरीकांच्या आरोग्य सेवाच्या दृष्टीकोणातून या भागात जवळच कोणतेही आरोग्य केंद्र नसल्याने या भागात उपरोक्त अस्तित्वात असलेल्या चार खोल्या मध्ये महानगरपालिकेचे आरोग्य केंद्र सुरू करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.६५९/८ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.१८ येथे वाचनालयासाठी २ लाख रू. मंजुर झाले होते परंतु तेवढ्या रकमेत ते काम पुर्ण होत नाही करीता पान क्र.डब्ल्यु-१६९ वरील १.५० लाख एवढी रक्कम घेण्यात आली होती.

वाचनालयासाठी एकुण रक्कम ३.५० लाख मंजुर झाली परंतु त्या ऐवजी पवननगर के-४० समोरील खुल्या जागेत कंपाउन्ड बांधणे करीता ३लाख ५० हजार रक्कम वळती करण्यात यावी ही विनंती.

सुचक :श्री.अत्तरदे प्रकाश सुका अनुमोदक :श्री.संजय केनेकर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,वार्ड क्र.१८ येथे वाचनालयासाठी २ लाख रू. मंजुर झाले होते परंतु तेवढ्या रकमेत ते काम पुर्ण होत नाही करीता पान क्र.डब्ल्यु-१६९ वरील १.५० लाख एवढी रक्कम घेण्यात आली होती.

वाचनालयासाठी एकुण रक्कम ३.५० लाख मंजुर झाली परंतु त्या ऐवजी पवननगर के-४० समोरील खुल्या जागेत कंपाउन्ड बांधणे करीता ३लाख ५० हजार रक्कम वळती करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**पुरवणी विषय**

**विषय क्र. ६६०/१ :**

सतीश मोटर्स ते क्रांतीचौक पोलीस स्टेशन चौक या रस्त्यास ''इंडियन मेडिकल असोसिएशन (आय.एम.अे.) मार्ग '' असे नामकरण करणे बाबत नागरिकांची मागणी आहे. नागरीकांनी केलेली मागणी विचारात घेता सदर रस्त्यास वरील प्रमाणे नामकरण करणे आवश्यक आहे.

करीता सतीश मोटर्स ते क्रांतीचौक पोलीस स्टेशन चौक या रस्त्यास ''इंडियन मेडिकल असोसिएशन(आय.एम.अे.)मार्ग''असे नामकरण करणेबाबत प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.भगवान (बापु) घडमोडे अनुमोदक : श्री.प्रशांत देसरडा

मा. महापौर : यात सतीश मोटर्स चौकास आयएमअे मार्ग व तेथील अर्ध्या रस्त्यालाच आयएमअे मार्ग असे नाव देण्यास मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,सतीश मोटर्स चौकास आयएमअे मार्ग व तेथील अर्ध्या रस्त्यालाच आयएमअे मार्ग असे नाव देण्यास मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

मा.महापौर : विषय क्र २ ते ५ सर्वानुमते मंजूर करण्यात येते.

**विषय क्र. ६६१/२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.२३ मध्ये अठरा खेडी विकास कामा अंतर्गत चिकलठाणा आठवडी बाजार विकासा करीता अर्थसंकल्पातील पान क्र.डब्ल्यु-१२५ वर र.रू.०१.५ लक्ष तरतुद करण्यात आलेली आहे त्या ऐवजी चौधरी कॉलनी येथील लहान व्यासाची ड्रेनेज लाईन काढून मोठ्या व्यासाची एस.डब्ल्युची ड्रेनेज लाईन टाकण्यात यावी, करीता लेखाशिर्ष बदलाचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्रीमती मिराताई शिंदे अनुमोदक : श्रीमती डॉ.आशा बिनवडे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.२३ मध्ये अठरा खेडी विकास कामा अंतर्गत चिकलठाणा आठवडी बाजार विकासा करीता अर्थसंकल्पातील पान क्र.डब्ल्यु-१२५ वर र.रू.०१.५ लक्ष असलेली तरतुद याऐवजी चौधरी कॉलनी येथील लहान व्यासाची ड्रेनेज लाईन काढून मोठ्या व्यासाची एस.डब्ल्यु.ची ड्रेनेज लाईन टाकण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६६२/३ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, प्रभाग क्र.८ पडेगांवसाठी अर्थसंकल्पात ०१. १८ खेडी विकास कार्यक्रम पान क्र.डब्ल्यु ७८,अ.क्र.२ वर तरतूद र.रू. १.०० लक्ष, ०२. स्लम देखभाल दुरूस्ती पा.क्र. डब्ल्यु ८४ अ.क्र. २ व ३ वर तरतूद र.रू.२.०० लक्ष या दोन्ही लेखशिर्षकाचे एकत्रीकरण करून प्रभाग क्र.८ पडेगांव व मिटमिटा स्लम अंतर्गत गल्ल्यांमध्ये पेव्हींग ब्लॉक बसविणेचे काम करण्याची परवानगी द्यावी. करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

सुचक : श्री.तरविंदरसिंग धिल्लन अनुमोदक : श्री.अब्दुल साजेद अब्दुल सत्तार

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,प्रभाग क्र.८ पडेगांवसाठी अर्थसंकल्पात ०१. १८ खेडी विकास कार्यक्रम पान क्र.डब्ल्यु ७८,अ.क्र.२ वर तरतूद र.रू. १.०० लक्ष, ०२. स्लम देखभाल दुरूस्ती पा.क्र. डब्ल्यु ८४ अ.क्र. २ व ३ वर तरतूद र.रू.२.०० लक्ष या दोन्ही लेखशिर्षकाचे एकत्रीकरण करून प्रभाग क्र.८ पडेगांव व मिटमिटा स्लम अंतर्गत गल्ल्यांमध्ये पेव्हींग ब्लॉक बसविणेचे काम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६६३/४ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, प्रभाग क्र.१२ जयभिमनगर घाटी येथील ड्रेनेज लाईनची दुरूस्ती करणे व इतर किरकोळ काम करणेसाठी खालील लेखाशिर्षक बदलण्याची परवानगी द्यावी.

१. बागा देखभाल व दुरूस्ती पान क्र.डब्ल्यु ८३ अ.क्र.४ तरतूद १.५० लक्ष

२. स्लम देखभाल व दुरूस्ती पान क्र.डब्ल्यु८४ अ.क्र.१४ तरतूद १.५० लक्ष

वरील दोन लेखाशिर्षक एकत्रीकरण करून प्रस्तावित काम करणे करीता परवानगी द्यावी.

सुचक : श्री.संजय जगताप

अनुमोदक : १.श्री.सय्यद खुसरो बुऱ्हानोद्दीन, २.श्रीमती मसरद युनूस पटेल

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.१२ जयभिमनगर घाटी येथील ड्रेनेज लाईनची दुरूस्ती करणे व इतर किरकोळ काम करणेसाठी खालील लेखाशिर्षक बदलण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

१. बागा देखभाल व दुरूस्ती पान क्र.डब्ल्यु ८३ अ.क्र.४ तरतूद १.५० लक्ष

२. स्लम देखभाल व दुरूस्ती पान क्र.डब्ल्यु८४ अ.क्र.१४ तरतूद १.५० लक्ष

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६६४/५ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, प्रभाग क्र.६३ कोकणवाडी मध्ये मनपा अर्थसंकल्प २००६-०७ मध्ये पान क्र.१६३ वरील सुलभ शौचालय या लेखाशिर्षका अंतर्गत अ.क्र.३ नुसार अं.प.रक्कम रूपये १०.०० लक्षची तरतूद स्था.समिती यांच्या शिफारशी नुसार ठेवण्यात आलेली आहे. परंतु जागा उपलब्ध होत नसल्याने सुलभ शौचालय बांधणे शक्य नाही. परिणामी उक्त तरतूदीचा विनियोग होणार नाही.

तरी सुलभ शौचालय या शिर्षका अंतर्गत असलेली अ.प.र.रू.१०.०० लक्ष पैकी रू.८.०० लक्ष रक्कम वार्ड क्र.६३ मध्ये विविध ठिकाणी पेव्हींग ब्लॉक बसविणे असा शिर्षक बदल करण्या बाबत प्रस्ताव सर्वसाधारण सभे समोर ठेवण्या बाबत विनंती.

सुचक : सौ.मंगला प्रकाश गायकवाड अनुमोदक : सौ.सरलाताई सखाराम पोळ

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.६३ कोकणवाडीसाठी अर्थसंकल्प २००६-०७ मध्ये पान क्र.१६३ वरील सुलभ शौचालय या लेखाशिर्षका अंतर्गत अ.क्र.३ नुसार असलेली अं.प.रक्कम रूपये १०.०० लक्ष याऐवजी अ.प.र.रू.१०.०० लक्ष पैकी र.रू.८.०० लक्ष वार्ड क्र.६३ मध्ये विविध ठिकाणी पेव्हींग ब्लॉक बसविणे असे लेखाशिर्षक बदलणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६६५/६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, माझ्या प्रभागातील नागेश्वरवाडी सारस्वत बँकेसमोरील मोळ्या जागेत वीर बाजीप्रभु देशपांडे यांचा पुर्णाकृती पुतळा उभारण्यात यावा. तसेच त्या ठिकाणी वाहतूक बेटाचे सौंदर्यीकरण करून या मार्गाला वीर बाजीप्रभु देशपांडे मार्ग असे नांव देण्यात यावे, करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर मंजुरीस्तव सादर.

सुचक : सौ.लता दलाल

अनुमोदक : श्री.संतोष खेंडके, श्री.अब्दुल साजेद, श्री.रेणुकादास वैद्य

श्री. अ.रशीद खान : तेथील टपऱ्या हटवून जागा केली. शहरात अनेक ठिकाणी महात्म्यांचे पूतळे लावणार असेल तर पार्कींगसाठी जागा कुठे देणार आहे. पूतळा बसविण्यानगर त्यांनी देखभाल दुरूस्ती ठेवली पाहिजे. सिध्दार्थ उद्यानात तीन पुतळे लावणार आहे. आपण जागा कशासाठी रिकामी केली. या बाबतीत कुणी न्यायालयात गेले तर महानगरपालिकेची बदनामी होईल.जे ही पूतळे उभारणार आहे ते उद्यान मध्ये करावे.

सौ.लता दलाल :हा प्रश्न माझ्या वार्डातील आहे.तेथे टपऱ्या होत्या परंतू ती जागा महापालिकेची होती. २५ वर्षापूर्वी महानगरपालिकेने कम्प्यान्सेशन दिलेले होते. ती जागा पार्कींग, बेटाचे सौदर्यीकरण तसेच पुलाचे रूंदीकरण यासाठी आहे. पार्कींग कुठपर्यत बेटाचे सौदयीकरण कूठपर्यत आहे हे प्रशासनाने तपासावे. बेटाचे सौदयीकरण करतांना तेथे पुतळा घ्यावा असा प्रस्ताव आहे. सारस्वत बँकला बांधकाम परवानगी देतांना त्यांनी पार्कींगची व्यवस्था करून दयावी असे परवानगी देतांना नमूद केले होते. सारस्वत बँकेने पूर्ण खर्च करायचा या अटीवरच परवानगी दिलेली होती. पूर्ण माहिती घेतल्यानंतर हा प्रस्ताव ठेवलेला आहे.

मा. महापौर : मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,नागेश्वरवाडी सारस्वत बँकेसमोरील मोळ्या जागेत वीर बाजीप्रभु देशपांडे यांचा पुर्णाकृती पुतळा उभारण्यात यावा. तसेच त्या ठिकाणी वाहतूक बेटाचे सौंदर्यीकरण करून या मार्गाला वीर बाजीप्रभु देशपांडे मार्ग असे नांव देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

ऐनवेळचे विषय

**विषय क्र. ६६६ :**

आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, औरंगाबाद शहरामध्ये भारत सरकारच्या सुचना व प्रसारण मंत्रालयाच्या गीत व नाटक विभागातर्फे व औरंगाबाद महानगरपालिकेत यांच्या संयुक्त विद्यमाने 'आख्यान महाराष्ट्र' हा कार्यक्रम दि.२६ जानेवारी २००७ ते २ फेब्रुवारी २००७ दरम्यान संपन्न होत आहे. या कार्यक्रमामध्ये महाराष्ट्राचा ऐतिहासिक वारसा, भारूड,लावणी,गोंधळ,ओवी इत्यादींचा समावेश असणार आहे. सदरील कार्यक्रम भारताच्या स्वातंत्र्यतेसाठी भारतामध्ये झालेल्या विविध चळवळीवर जसे जलियनवाला बाग,दांडी मार्च,भारत छोडो आंदोलन यावर आधारीत आहे. या कार्यक्रमामध्ये एकुण २०० कलावंत सहभागी होणार असून स्थानिक १०० कलावंतांना त्यांच्या कला प्रदर्शित करण्यासाठी वाव मिळणार आहे. सदरील कार्यक्रमाची सुरूवात औरंगाबाद शहरापासून होत आहे.

केंद्र सरकारने आयोजित केलेल्या कार्यक्रमासाठी ६ ते ७ लक्ष रूपये केंद्र शासन खर्च करणार आहेत. कार्यक्रमासाठी १० ते १२ स्टेजची आवश्यकता असून या कार्यक्रमाकरिता अंदाजे ८ ते १२ हजार रसिक प्रेक्षक उपस्थित राहण्याची शक्यता आहे. त्या करीता बैठक व्यवस्था, विद्युत व्यवस्था,बॅराकेटींग इत्यादीची व्यवस्था स्थानिक प्रशासनाने करावी असे पत्र औरंगाबाद महानगरपालिकेकडे पत्र दि.५.१२.२००६ रोजी प्राप्त झालेले आहे. सदरील कार्यक्रम हा अजिंठा-वेरूळ महोत्सव समिती औरंगाबाद महानगरपालिकेच्या संयुक्त विद्यमाने संपन्न होत असुन कार्यक्रम औरंगाबाद शहरात होत असल्यामुळे या शहराच्या नाव लौकीकात भर पडेल. कार्यक्रमाची व्यवस्था करण्यासाठी साधारणत: रू.५.०० लक्ष खर्च अपेक्षित आहे. करिता संभाव्य खर्चास व कार्यक्रम औरंगाबाद शहरात आयोजीत करण्याच्या मान्यतेस्तव प्रस्ताव सादर.

मा. महापौर : सदरील विषय मंजूर करण्यात येतो. तसेच लेखा शिर्षक बदलण्याचे सर्व प्रस्ताव आहे ते सर्व मंजूर करण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,केंद्र सरकारने आयोजित केलेल्या कार्यक्रमासाठी ६ ते ७ लक्ष रूपये केंद्र शासन खर्च करणार आहेत. कार्यक्रमासाठी १० ते १२ स्टेजची आवश्यकता असून या कार्यक्रमाकरिता अंदाजे ८ ते १२ हजार रसिक प्रेक्षक उपस्थित राहण्याची शक्यता आहे. त्या करीता बैठक व्यवस्था, विद्युत व्यवस्था,बॅराकेटींग इत्यादीची व्यवस्था स्थानिक प्रशासनाने करावी असे पत्र औरंगाबाद महानगरपालिकेकडे पत्र दि.५.१२.२००६ रोजी प्राप्त झालेले आहे. सदरील कार्यक्रम हा अजिंठा-वेरूळ महोत्सव समिती औरंगाबाद महानगरपालिकेच्या संयुक्त विद्यमाने संपन्न होत असुन कार्यक्रम औरंगाबाद शहरात होत असल्यामुळे या शहराच्या नाव लौकीकात भर पडेल. कार्यक्रमाची व्यवस्था करण्यासाठी साधारणत: रू.५.०० लक्ष खर्च अपेक्षित आहे. करिता संभाव्य खर्चास व कार्यक्रम औरंगाबाद शहरात आयोजीत करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६६७ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.०२ जाधव वाडी मो.मोहिनी राजपुरम श्रीनिवास कं.क रेखांकन ते मुख्य ट्रंक सिव्हर पर्यंत मुख्य ड्रेनेज लाईन टाकणे, या कामाचे अंदाजपत्रक म.जी.प्रा/सा.बा. खात्याच्या सन २००५-०६ च्या दरसुची नुसार तयार करण्यात आले असुन, अंदाजपत्रक र.रू.२४,३२,०००/- आहे. सदरील काम सन २००६-०७ च्या अर्थसंकल्प पुस्तिकेतील पान

क्र.१५६/०२ वरील १८.०० लक्ष व पान क्र.डब्ल्यु.५९ वरील अ.क्र.०१ मधील ५०.०० लक्ष पैकी ६,३२,०००/- तरतुद भांडवली कामे जलनि:सारण या लेखा शिर्ष मधुन प्रस्तावीत आहे.

तरी रक्कम रू.२४,३२,०००/- चे अंदाजपत्रक मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.०२ जाधव वाडी मो.मोहिनी राजपुरम श्रीनिवास कं.क रेखांकन ते मुख्य ट्रंक सिव्हर पर्यंत मुख्य ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाचे र.रू.२४,३२,०००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील काम सन २००६-०७ च्या अर्थसंकल्प पुस्तिकेतील पान क्र.१५६/०२ वरील र.रू.१८.०० लक्ष व पान क्र.डब्ल्यु.५९ वरील अ.क्र.०१ मधील र.रू.५०.०० लक्ष पैकी र.रू.६,३२,०००/- तरतुद भांडवली कामे जलनि:सारण या लेखा शिर्ष मधुन करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६६८ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्रमांक ०७ अंतर्गत मो.भिमनगर भावसिंगपुरा स्लम भागात दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाचे अंदाजपत्रक २००५-२००६ च्या दरसूची नुसार तयार करण्यात आले असून अ.प.र.रू. ९,९४,६००/- होत आहे.

प्रस्तावीत कामाचा खर्च नागरी दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत शासन निर्णय क्र./पुरक/ विधयो-१०२००६/प.क्र.१२/२००६/नवि-४, मंत्रालय मुंबई -४०००३२ दिनांक ३१ मार्च २००६ च्या जोडपत्रावरील अ.क्र.१२४ वर औरंगाबाद महानगरपालिकेसाठी उपलब्ध झालेल्या र.रू.१६७.५८ लक्ष मधून प्रस्तावीत आहे.

अंदाजपत्रक र.रू.९,९४,६००/- चे प्रस्तावित काम उपरोक्त नमूद शासन निर्णयानुसार उपलब्ध झालेल्या तरतूदी मधून करून घेणेच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्रमांक ०७ अंतर्गत मो.भिमनगर भावसिंगपुरा स्लम भागात दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाचे र.रू. ९,९४,६००/- च्या अंदाजपत्रकास तसेच प्रस्तावीत कामाचा खर्च नागरी दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत शासन निर्णय क्र./पुरक/ विधयो-१०२००६/प.क्र.१२/२००६/नवि-४, मंत्रालय मुंबई -४०००३२ दिनांक ३१ मार्च २००६ च्या जोडपत्रावरील अ.क्र.१२४ वर औरंगाबाद महानगरपालिकेसाठी उपलब्ध झालेल्या र.रू.१६७.५८ लक्ष मधून करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६६९ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.-३, नवजीवन कॉलनी या भागामध्ये पाऊसाळ्यात नेहमी घरात पाणी शिरते व ड्रेनेज लाईन मधूनही घरात पाणी शिरते. त्यामूळे दरवर्षी आतापर्यंत नागरीकांचे फार नुकसान झालेले आहे व नागरीकांचा संसार उघड्यावर पडलेला आहे. त्यामूळे या भागातील नाल्या मोठ्या करणे व ड्रेनेज लाईन बदलणे फार आवश्यक आहे. व स्वत: कार्यकारी अभियंता श्री.एस.डी.पानझडे यांनी पाहणी केलेली आहे व कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. व नाल्याच्या कामासाठी अंदाजपत्रक रू.९,४८,०००/- (अक्षरी नऊ लाख अठ्ठेचाळीस हजार फक्त) व ड्रेनेजलाईन बदलण्यासाठी रू.९,९९,५००/- (अक्षरी रक्कम रूपये नऊ लाख नव्व्यान्नव हजार पाचशे फक्त) या वरील दोन्ही कामासाठी खर्च आवश्यक आहे.

तरी वरील दोन्ही काम करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या १२ व्या वित्त आयोगाकडून प्राप्त निधीतून वरील काम तातडीचे असल्यामूळे पावसाळ्यापूर्वी काम सुरू करण्यात यावे. व वरील काम करण्यासाठी प्रशासकीय मान्यता देण्यांत यावी. करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.भाऊसाहेब ताठे अनुमोदक : श्री.संजय रिडलॉन, श्री.कवरसिंग बैनाडे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.-३, नवजीवन कॉलनी या भागामधील नाल्या मोठ्या करणेच्या कामासाठीचे र.रू.९,४८,०००/- (अक्षरी नऊ लाख अठ्ठेचाळीस हजार फक्त) व ड्रेनेजलाईन बदलण्यासाठीच्या र.रू.९,९९,५००/- (अक्षरी रक्कम रूपये नऊ लाख नव्व्यान्नव हजार पाचशे फक्त) या दोन्ही कामासाठीच्या अंदाजपत्रकास मान्यता देण्यांत येते. तसेच सदरील दोन्ही कामे महाराष्ट्र शासनाच्या १२ व्या वित्त आयोगाकडून प्राप्त निधीतून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६७० :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.२६ गणेशनगर सिडको मधील कामासाठी अर्थसंकल्पातील तरतुदीत खालील दर्शविल्याप्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यात यावे करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

| अर्थसंकल्पातील पान क्र. | कामाचे नाव | सुधारीत कामाचे नाव |
|---|---|---|
| डब्ल्यु-१६९ | वार्ड क्र.२६ मध्ये जलनि:सारण वाहिनी टाकणे-१५.०० लक्ष | प्रभाग क्र.२६ येथील रस्त्याचे खडीकरण करणे. १०.०० लक्ष.<br>वार्ड क्र.२५ व २६ पेव्हींग ब्लॉक बसविणे ५.०० लक्ष. |

सुचक : श्री.काशिनाथ कोकाटे अनुमोदक : श्री.प्रकाश अत्तरदे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.२६ गणेशनगर सिडको मधील कामासाठी अर्थसंकल्पातील तरतुदीत खालील दर्शविल्याप्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

| अर्थसंकल्पातील पान क्र. | कामाचे नाव | सुधारीत कामाचे नाव |
|---|---|---|
| डब्ल्यु-१६९ | वार्ड क्र.२६ मध्ये जलनि:सारण वाहिनी टाकणे-१५.०० लक्ष | प्रभाग क्र.२६ येथील रस्त्याचे खडीकरण करणे. १०.०० लक्ष.<br>वार्ड क्र.२५ व २६ पेव्हींग ब्लॉक बसविणे ५.०० लक्ष. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६७१ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.६१ मध्ये अर्थसंकल्पातील सन २००५-२००६ या चालु आर्थिक वर्षातील कामे १)पान क्र.डब्ल्यु-१५७/२६ यामध्ये जलनि:सारण वाहिनी टाकण्याकरीता १० लक्ष तरतुद करण्यात आलेली आहे. तसेच २) पान क्र. डब्ल्यु-१८२ वर नाला संरक्षण भिंत करीता ४ लक्ष तरतुद करण्यात आलेली आहे. त्याऐवजी समर्थनगर येथील दक्षिणे कडील साईड पंख्याचे डांबरीकरण करीता

उपरोक्त दोन्ही कामासाठी करण्यात आलेली तरतुद असे एकुण एकत्रीत १४ लक्ष तरतुद सदरील कामासाठी वळती करून वापरण्यात यावी. करीता प्रस्ताव मंजुर करण्यात यावा.

सुचक : सौ.कला बोरामणीकर अनुमोदक : सौ.रजनी जोशी, श्री.राजू वैद्य

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,वार्ड क्र.६१ मध्ये अर्थसंकल्पातील सन २००५-२००६ या चालु आर्थिक वर्षातील कामे १)पान क्र.डब्ल्यु-१५७/२६ यामध्ये जलनि:सारण वाहिनी टाकण्याकरीता १० लक्ष तरतुद करण्यात आलेली आहे. तसेच २) पान क्र. डब्ल्यु-१८२ वर नाला संरक्षण भिंत करीता ४ लक्ष तरतुद करण्यात आलेली आहे. त्याऐवजी समर्थनगर येथील दक्षिणे कडील साईड पंख्याचे डांबरीकरण करीता उपरोक्त दोन्ही कामासाठी करण्यात आलेली तरतुद असे एकुण एकत्रीत १४ लक्ष तरतुद सदरील कामासाठी वळती करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६७२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र. ६१ मधील समर्थनगर भागातील निराला बाजार ते नागेश्वरवाडी पर्यंत रस्ता रूंदीकरण व फुटपाथ बांधणे करीता अर्थसंकल्पातील पान क्र.डब्ल्यु २५/१ वर ५ लक्ष तरतुद करण्यात आलेली होती, त्याऐवजी समर्थनगर येथील विविध गल्लीत ड्रेनेज लाईन बदलण्याकरीता ५ लक्ष तरतुद वापरण्यात यावी.

करीता सदरील प्रस्ताव मंजुर करण्यात यावा.

सुचक : सौ.कला बोरामणीकर अनुमोदक : सौ.रजनी जोशी, श्री.सतीष कटकटे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,वार्ड क्र. ६१ मधील समर्थनगर भागातील निराला बाजार ते नागेश्वरवाडी पर्यंत रस्ता रूंदीकरण व फुटपाथ बांधणे करीता अर्थसंकल्पातील पान क्र.डब्ल्यु २५/१ वर ५ लक्ष तरतुद करण्यात आलेली होती, त्याऐवजी समर्थनगर येथील विविध गल्लीत ड्रेनेज लाईन बदलण्याकरीता ५ लक्ष तरतुदीस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६७३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,

| अ. क्र. | अर्थसंकल्पातील पान क्र. | कामाचे नाव | सुधारीत कामाचे नाव |
|---|---|---|---|
| १ | डब्ल्यु-१४० | खिवंसरा पार्क (पूर्व) येथील रस्त्याचे डांबरीकरण करण्यासाठी तरतुद रक्कम ६.०० लक्ष, परंतु या कामातुन १ लाख ६७ हजार शिल्लक राहत आहे. | प्रभाग क्र.८७ उल्कानगरी मधील तिरूपती एक्झीक्युटीव्ह जवळ पाण्याची लाईन टाकणे.अ.प.५७ हजार आणि उर्वरीत<br>२) प्रभाग क्र.८७ येथे विविध कामे करण्यासाठी तरतुद. |
| २ | डब्ल्यु-२४ | वर्धमान रेसीडेंसी ते खिवंसरा पार्क रस्त्याचे डांबरीकरण कामाकरीता १२ लाख अर्थसंकल्पात तरतुद करण्यात आली होती, पैकी ४.७६ इतर कामासाठी,११/८/०६ सर्वसाधारण सभेत मंजुर केली. उर्वरीत ७ लाख २४ हजार पैकी रस्त्याच्या विकासकामाकरीता अ.प.६ लाख ८९ हजार रू.खर्च प्रस्तावित केला सदर लेखाशिर्षातून ३४ हजार एवढी रक्कम शिल्लक राहते. | १) प्रभाग क्र. ८७ येथे विविध विकास कामे करण्यासाठी तरतुद ठेवण्यात यावी. र.रू.३४ हजार |

सुचक : सौ.अंजली कोंडेकर अनुमोदक : श्रीमती डॉ.आशा बिनवडे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अर्थसंकल्पात प्रभाग क्र.८७ करीता असलेल्या तरतूदीचे प्रस्तुत प्रस्तावातील अ.क्र.१ ते २ प्रमाणे लेखाशिर्ष बदलणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६७४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,

| अ. क्र. | अर्थसंकल्पातील पान क्र. | कामाचे नाव | सुधारीत कामाचे नाव |
|---|---|---|---|
| १ | डब्ल्यु-२४ | १) सहयोग नगर मुख्य रस्त्यावर एका बाजूस फुटपाथ करणे. ३.५ लाख.<br>२) सहयोग नगर येथील मनपाच्या मोकळ्या जागेत फरशी बसविणे रू.१.२६ | १) प्रभाग क्र.८७ उल्कानगरी येथील श्रीनगर येथे मोकळ्या जागेत पेव्हर बसविणे. |

सुचक : सौ.अंजली कोंडेकर अनुमोदक : श्रीमती डॉ.आशा बिनवडे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अर्थसंकल्पात प्रभाग क्र.८७ करीता असलेल्या तरतूदीचे खालीलप्रमाणे लेखाशिर्ष बदलणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

| अ. क्र. | अर्थसंकल्पातील पान क्र. | कामाचे नाव | सुधारीत कामाचे नाव |
|---|---|---|---|
| १ | डब्ल्यु-२४ | ३) सहयोग नगर मुख्य रस्त्यावर एका बाजूस फुटपाथ करणे. ३.५ लाख.<br>४) सहयोग नगर येथील मनपाच्या मोकळ्या जागेत फरशी बसविणे रू.१.२६ | १) प्रभाग क्र.८७ उल्कानगरी येथील श्रीनगर येथे मोकळ्या जागेत पेव्हर बसविणे. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६७५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.२६ गणेशनगर सिडको मधील कामासाठी अर्थसंकल्पातील तरतुदीत खालील दर्शविल्याप्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यात यावे करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

| अर्थसंकल्प पान नं. | कामाचे नाव | सुधारीत कामाचे नाव |
|---|---|---|
| डब्ल्यु-१६६ | आझाद चौक ते सिमबॉसीस हॉ.सो.एन-८ समोर आर.सी.सी.पुल करणे-५०.०० लक्ष. | १)प्रभाग क्र.२६ मधील विविध रस्त्यांचे डांबरीकरण करणे-२५.०० लक्ष.<br>२)प्रभाग क्र.२६ मधील बहुउद्देशिय जिम्नॅशियम हॉल बांधणे -२५.०० लक्ष. |

सुचक : श्री.काशिनाथ कोकाटे अनुमोदक : श्री.रेणुकादास (राजु) वैद्य

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.२६ गणेशनगर सिडको मधील कामासाठी अर्थसंकल्पातील तरतुदीत खालील दर्शविल्याप्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

| अर्थसंकल्प पान नं. | कामाचे नाव | सुधारीत कामाचे नाव |
|---|---|---|
| डब्ल्यु-१६६ | आझाद चौक ते सिमबॉसीस हॉ.सो.एन-८ समोर आर.सी.सी.पुल करणे-५०.०० लक्ष. | १)प्रभाग क्र.२६ मधील विविध रस्त्यांचे डांबरीकरण करणे-२५.०० लक्ष.<br>२)प्रभाग क्र.२६ मधील बहुउद्देशिय जिम्नॅशियम हॉल बांधणे -२५.०० लक्ष. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६७६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिकेत उप महापौरांना विशेष अधिकार नसल्यामुळे सदरील पदावर काम करताना नागरीकांच्या या पदाविषयीच्या अपेक्षेनुसार काम करण्यात अडचणी येतात. त्या अनुषंगाने इतर महानगरपालिकेत उप महापौरांना काय अधिकार आहेत? या विषयी माहिती घेण्याचे दृष्टीकोनातुन औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे अखिल भारतीय स्तरावर उप महापौरांची परीषद फेब्रुवारी २००७ महिन्यात घेण्यात यावी, जेणे करून यात अखिल भारतीय स्तरावर उपमहापौरांचे अधिकार व त्यांची कर्तव्ये यावर चर्चा करून उप महापौरांना अधिकार देणे बाबत शासन स्तरावर प्रयत्न करता येईल.

करीता फेब्रुवारी २००७ मध्ये किंवा तद्नंतर अखिल भारतीय स्तरावर उप महापौरांची परीषद आयोजीत करणे बाबत व या परिषदेस येणाऱ्या संभाव्य खर्चासह प्रस्ताव सर्व साधारण सभेपुढे मंजुरीस्तव सादर.

सुचक : सौ.लता दलाल

अनुमोदक : श्री.रेणुकादास वैद्य, श्री.संतोष खेंडके, श्री.अब्दुल साजेद, श्री.संजय जोशी, श्री.रशिद खान, श्रीमती डॉ.आशा बिनवडे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अखिल भारतीय स्तरावर उपमहापौरांचे अधिकार व त्यांची कर्तव्ये यावर चर्चा करणेसाठी औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे अखिल भारतीय स्तरावर उपमहापौर परीषद फेब्रुवारी २००७ किंवा तद्नंतर आयोजीत करणेस व या परिषदेसाठी येणाऱ्या संभाव्य खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६७७ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महिला सबलीकरण धोरणाच्या अनुषंगाने महानगरपालिकेच्या महिला व बाल कल्याण समितीच्या वतीने प्रत्येक प्रभागात असणाऱ्या महिला बचत गटासाठी रोजगार उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने ''पीठाची गिरणी'' उपलब्ध करून देण्याचे प्रस्तावित आहे. त्याकरीता एकूण ९८ गिरण्या खरेदी कराव्या लागतील.

प्रत्येक प्रभागातील एक बचत गटास पिठाची गिरणी देण्याबाबतचा व एकूण ९८ गिरण्या खरेदी करण्याबाबतचा प्रस्ताव येणाऱ्या संभाव्य खर्चाच्या मान्यतेसह सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक : सौ.विमल बेंद्रे अनुमोदक : सौ.छाया राऊत

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महिला सबलीकरण धोरणाच्या अनुषंगाने महानगरपालिकेच्या महिला व बाल कल्याण समितीच्या वतीने प्रत्येक प्रभागातील महिला बचत गटासाठी रोजगार उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने प्रत्येक प्रभागासाठी एक पीठाची गिरणी देण्यास व त्याकरीता एकूण ९८ गिरण्या खरेदी करणेकरीता येणाऱ्या संभाव्य खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते,वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६७८ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.१० येथील जयसिंगपुरा येथे विविध ठिकाणी जलवाहीनी टाकणे या कामासाठी मनपा अर्थसंकल्प २००६-०७ मधील पान नं.१८३ वर रक्कम रूपये ३.०० लक्षाची तरतूद करण्यात आलेली आहे. परंतू सदरील कामाऐवजी वार्ड नं.१० मध्ये (१) वॉर्डात विविध ठिकाणी बोरींग करणेसाठी रक्कम रूपये १.५० लाखाची आर्थिक तरतुद करणे.

(२) वार्डात विविध ठिकाणी गटार व ड्रेनेजचे दुरूस्तीचे कामे करण्यासाठी रक्कम रूपये १.५० लाखाची आर्थीक तरतुद करणे.

तरी वरील प्रमाणे कामे रहिवासीयांच्या सुविधेसाठी करण्यास अर्थसंकल्पातील रक्कम वर्ग करण्यासाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.सलीमखान यासिनखान अनुमोदक : श्री.दिलीप गायकवाड, श्री.संजय जगताप

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.१० जयसिंगपुरा येथे विविध ठिकाणी जलवाहीनी टाकणे या कामासाठी मनपा अर्थसंकल्प २००६-०७ मधील पान नं.१८३ वरील असलेली तरतूद र.रू.३.०० लक्ष याऐवजी वार्ड नं.१० मध्ये (१) वॉर्डात विविध ठिकाणी बोरींग करणेसाठी र.रू.१.५० लाख व (२) वार्डात विविध ठिकाणी गटार व ड्रेनेजचे दुरूस्तीचे कामे करण्यासाठी र.रू.१.५० लाख असे लेखाशिर्ष बदलणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६७९ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.१४ रोजेबाग मधील कामासाठी अर्थसंकल्पातील तरतुदीत खालील दर्शविल्याप्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यात यावे करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | कामाचे नाव | सुधारीत कामाचे नाव |
|---|---|---|
| डब्ल्यु-१०० | **स्लम भागात पुन:डांबरीकरण**<br>वार्ड क्र.१४ मधील सिध्दार्थनगर येथील रस्त्याचे पुन:डांबरीकरण करणे-०३.०० लक्ष.<br>सदरील काम रद्द करण्यात यावे. | वार्ड क्र.१४ मध्ये सिध्दार्थनगर येथे बौध्दविहार समाजमंदीर ते साई मेडीकल पर्यंत पेव्हर ब्लॉक बसविणे-०३.०० लक्ष |

सुचक : श्री.दिलीप गायकवाड अनुमोदक : श्री.काशिनाथ कोकाटे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.१४ रोजेबाग मधील कामासाठी अर्थसंकल्पातील तरतुदीत वरील प्रस्तावाप्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६८० :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिकेच्या सन २००६-०७ च्या अर्थसंकल्पात पृष्ठ क्रं.डब्ल्यु-१५४, वर प्रभाग क्रमांक-६२ समतानगर भागातील रस्त्यांचे पुर्न:डांबरीकरण करणे या

शिर्षकातंर्गत रक्कम रूपये ०५ लाखाची तरतूद करण्यात आलेली आहे. परंतु त्या कामा ऐवजी प्रभाग क्र.-६२ मधील हॉटेल औरंगाबाद अशोका येथे डांबरीकरण करणे या कामासाठी सदरील रक्कम वर्ग करण्यात यावी. तसेच पान क्रमांक डब्ल्यु-१२० म्हाडा कॉलनी येथे डांबरीकरण करणे रक्कम रूपये ०३ लाखची तरतूद करण्यात आलेली परंतु त्याऐवजी म्हाडा कॉलनी येथे पेव्हर ब्लॉक बसविणे या कामासाठी सदरील रक्कम वर्ग करण्यात यावी.

प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.मधुकर सावंत अनुमोदक : श्री.साहेबराव कावडे,श्री.अनिल जैस्वाल

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या सन २००६-०७ च्या अर्थसंकल्पात पृष्ठ क्रं. डब्ल्यु-१५४, वर प्रभाग क्रमांक-६२ समतानगर भागातील रस्त्यांचे पुर्न:डांबरीकरण करणे या शिर्षकातंर्गत रक्कम रूपये ५.०० लाखाची असलेली तरतूद या कामाऐवजी प्रभाग क्र.-६२ मधील हॉटेल औरंगाबाद अशोका येथे डांबरीकरण करणेसाठी सदरील रक्कम वर्ग करण्यास तसेच पान क्रमांक डब्ल्यु-१२० म्हाडा कॉलनी येथे डांबरीकरण करणे रक्कम रूपये ३.०० लाखाची असलेली तरतूद याऐवजी म्हाडा कॉलनी येथे पेव्हर ब्लॉक बसविणे या कामासाठी सदरील रक्कम वर्ग करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६८१ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.१९ मध्ये जलनिसा:रण वाहिनी टाकण्याकरीता अर्थसंकल्पात पान क्र.डब्ल्यु १६९ मध्ये ५ लक्ष तरतुद करण्यात आलेली आहे. तथापी या कामाऐवजी वार्ड क्र.१९ मध्ये विविध भागात कॉंक्रेटींग रोड करण्यासाठी वळती करून प्रस्ताव सर्वानुमते मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.अनिल जैस्वाल अनुमोदक : श्री.संतोष खेंडके पाटील, श्री.रविंद्र गांगे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.१९ मध्ये जलनिसा:रण वाहिनी टाकण्याकरीता अर्थसंकल्पात पान क्र.डब्ल्यु १६९ वर ठेवण्यात आलेली र.रू.५.०० लक्ष तरतुद या कामाऐवजी वार्ड क्र.१९ मध्ये विविध भागात कॉंक्रेटींग रोड करण्यासाठी वळती करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६८२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, विषय क्र.५७५ अन्वये दि.२७.१०.२००६ च्या सर्व साधारण सभेत ज्योतीनगर प्रभाग क्र.८९ येथील काव्यउद्यान विकसित करणेच्या कामासाठी रक्कम रू. ४ लक्ष वळती करण्यांचा ठराव पारीत करण्यात आला होता. तद्नुषंगाने सदरील काम संबंधीत मूळ मंजूर निविदाधारकांकडून त्यांचे मंजूर दरात वाढीव काम करून घेण्याचा प्रस्ताव ऐनवेळी मंजूरीस्तव सादर.

सुचक: सौ.विजया रहाटकर अनुमोदक: श्री संजय जोशी श्री भाऊसाहेब ताठे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, विषय क्र.५७५ अन्वये दि.२७.१०.२००६ च्या सर्व साधारण सभेत ज्योतीनगर प्रभाग क्र.८९ येथील काव्यउद्यान विकसित करणेच्या कामासाठी रक्कम रू. ४ लक्ष वळती करण्यांचा ठराव पारीत करण्यात आला होता. तद्नुषंगाने सदरील काम संबंधीत मूळ मंजूर निविदाधारकांकडून त्यांचे मंजूर दरात वाढीव काम करून घेण्यास सर्वानमते मंजूरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६८३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सर्वसाधारण सभा दिनांक १७.१०.२००६ प्रस्ताव क्र.५५१ अन्वये बॉटणीकल गार्डनच्या लेखाशिर्षामधुन बनेवाडी,राहुलनगर,सादातनगर खामनदीच्या रिटर्निंग वॉल बांधण्यासाठी र.रू.५०,०००००/- मंजुर करण्याचा प्रस्ताव पारित झालेला आहे.

परंतु आता सुधारीत प्रस्ताव सादर करण्यात येते की, सदरील रिटर्निंग वॉलचे कामाकरीता बॉटणीकल गार्डनच्या लेखाशिर्ष ऐवजी वित्त आयोगाकडून प्राप्त झालेल्या रक्कमेतुन रूपये ५०,०००००/- वर्ग करणेचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.अब्दुल साजेद अब्दुल सत्तार अनुमोदक : श्री.सय्यद खुसरो सय्यद बुऱ्हानोद्दीन

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,सर्वसाधारण सभा दिनांक १७.१०.२००६ प्रस्ताव क्र.५५१ अन्वये बॉटणीकल गार्डनच्या लेखाशिर्षामधुन बनेवाडी,राहुलनगर,सादातनगर खामनदीच्या रिटर्निंग वॉल बांधण्यासाठी र.रू.५०,०००००/- मंजुर करण्याचा प्रस्ताव पारित झालेला आहे.

परंतु आता सुधारीत प्रस्ताव सादर करण्यात येते की, सदरील रिटर्निंग वॉलचे कामाकरीता बॉटणीकल गार्डनच्या लेखाशिर्ष ऐवजी वित्त आयोगाकडून प्राप्त झालेल्या रक्कमेतुन रूपये ५०,०००००/- वर्ग करणेचा प्रस्ताव सर्वानुमते मंजुर करण्यात येतो वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६८४:**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,औरंगाबाद जिल्हयातील श्रीक्षेत्र वेरूळ हे १२ ज्योर्तिलिंगापैकी १२ वे स्थान आहे. येथे दरवर्षी महाशिवरात्रीला मोठी यात्रा भरते. सदरील यात्रेसाठी संपूर्ण महाराष्ट्रातून व औरंगाबाद शहरातून फार मोठया प्रमाणात नागरिक जात असतात. याबाबींचा विचार करून श्रीक्षेत्र वेरूळ,घृष्णेश्वर देवस्थान येथे सुरक्षिततेचा उपाय म्हणून महाशिवरात्रीच्या दिवशी औरंगाबाद महानगरपालिकेमार्फत अग्निशमन दलाची गाडी मोफत पुरविण्याबाबतचा प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

करिता प्रस्ताव सर्व साधारण सभेच्या ऐनवेळीचा प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

सूचक: श्री अनिल जैस्वाल अनुमोदक: श्री बन्सी गांगवे(मामा)
सौ.विजया रहाटकर श्री भाऊसाहेब ताठे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्रीक्षेत्र वेरूळ,घृष्णेश्वर देवस्थान येथे सुरक्षिततेचा उपाय म्हणून महाशिवरात्रीच्या दिवशी औरंगाबाद महानगरपालिकेमार्फत अग्निशमन दलाची गाडी मोफत पुरविण्याबाबतच्या प्रस्तावास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६८५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या सन २००६-०७ च्या अर्थसंकल्पात प्रभाग क्र.६२ मधील लेखाशिर्ष बदलणे बाबत दिनांक ११.८.२००६ च्या सर्वसाधारण सभेत विषय क्र.३५१ अन्वये ठराव मंजुर करण्यात आलेला आहे त्या अन्वये म्हाडा कॉलनी येथे फुटपाथ बनविणे या कामाचे लेखाशिर्षात बदल करण्यात येऊन त्याऐवजी चिंतामणी कॉलनी येथे फुटपाथ बनविणे असा बदल करण्यात यावा.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,औरंगाबाद महानगरपालिकेच्या सन २००६-०७ च्या अर्थसंकल्पात प्रभाग क्र.६२ मधील लेखाशिर्ष बदलणे बाबत दिनांक ११.८.२००६ च्या सर्वसाधारण सभेत विषय

क्र.३५१ अन्वये ठराव मंजुर करण्यात आलेला आहे त्या अन्वये म्हाडा कॉलनी येथे फुटपाथ बनविणे या कामाचे लेखाशिर्षात बदल करण्यात येऊन त्याऐवजी चिंतामणी कॉलनी येथे फुटपाथ बनविणे असा बदल करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**चर्चा :**

श्री.संतोष खेंडके :विदयानगर येथील तारंकुपन काढण्याच्या संदर्भात निर्णय होवूनही कार्यवाही केलेली नाही. माझ्या प्रश्नाचा खूलासा करण्यात यावा.

याचवेळी मा.महापौर डायसमोर स. सभासद एकत्र येवून मोठमोठयाने बोलतात काहीही ऐकू येत नाही.

**विषय क्र. ६८६ :**

औरंगाबाद महानगरपालिका ही मराठवाड्यातील पहिली महापालिका आहे. तसेच देशविदेशात औरंगाबाद शहर हे विविध ऐतिहासीक ठिकाणामुळे सुप्रसिध्द आहे. औरंगाबाद शहराची ही ऐतिहासीक पार्श्वभूमी लक्षात घेता शहराच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने महाराष्ट्रातील प्रमुख शहरातील काम काजाची माहितीची व अनुभवाची देवाणघेवाण व्हावे. या दृष्टीने औरंगाबाद शहरात **''अखिल महाराष्ट्र महापौर परिषदेचे''** आयोजन करण्यात यावे. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.संतोष खेंडके पाटील अनुमोदक : श्री.भाऊसाहेब ताठे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,औरंगाबाद महानगरपालिका ही मराठवाड्यातील पहिली महापालिका आहे. तसेच देशविदेशात औरंगाबाद शहर हे विविध ऐतिहासीक ठिकाणामुळे सुप्रसिध्द आहे. औरंगाबाद शहराची ही ऐतिहासीक पार्श्वभूमी लक्षात घेता शहराच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने महाराष्ट्रातील प्रमुख शहरातील काम काजाची माहितीची व अनुभवाची देवाणघेवाण व्हावे. या दृष्टीने औरंगाबाद शहरात **''अखिल महाराष्ट्र महापौर परिषदेचे''** आयोजन करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

याचबरोबर आजची सभा ''राष्ट्रगिताने''संपल्याचे मा.महापौर यांनी घोषीत केले.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद